म. ग्रं. स. ठाणे
विषय

# अंदमान

उषा देशपांडे



REFBK-0025096

# अंदमान

उषा देशपांडे

REFBK-0025096

इंद्रायणी साहित्य
पुणे

प्रकाशक

श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३, शनिवार पेठ, पुणे ३०

मुद्रक .

प्रमोद वि बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

प्रकाशन दिनांक ४ मार्च १९८६

© उषा देशपांडे

मूल्य चौदा रुपये

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळालेले आहे

# अंदमान

# अंदमानातील आदिवासींचे चित्रीकरण

क्लिक् .

समोरच्या पांढऱ्या भिंतीवर पसरला एक विशाल मोरपखी समुद्र !

क्लिक् .

रुपेरी वाळूचा रुंद मखमली समुद्रकिनारा, निळ्या साडीला जरीचा काठ असावा ना, तसाच !

क्लिक्.

समुद्रकिनारी फेर धरून झिम्मा खेळणारी नारळीची झाडं अन् त्याच्या झावळ्यावर विसावलेली सोनेरी किरणं !

भराभर बदलणाऱ्या स्लाईड्स्‌नी त्या पांढऱ्या भिंतीवर रंगीबेरंगी स्वप्नाचं जाळं विणलं होतं अन् ती स्वप्नं डोळ्यात साठवीत असतानाच मी विचार करत होते, कुठं आहे हा सुंदर स्वर्ग ? कुठं सापडतो हा नयनरम्य खजिना ? कुठं ? मॉरिशस ? हवाई ?

कुठं ? कुठं ?

मग कुणीतरी नाव सांगितलं, "अंदमान !"

अंदमान ? नकळत भीतीची एक लहर मनावर उमटली. अंदमान म्हणजे तर काळं पाणी ! तिथं जायचं म्हणजे जन्मठेपेची शिक्षाच ! असं ठिकाण इतकं सुंदर कसं असेल ?

कलकत्त्याहून पोर्ट ब्लेअरला जाणाऱ्या ' हर्षवर्धन ' जहाजावर मी चढले तरीही माझ्या मनात हीच प्रश्नचिन्ह रेंगाळत होती नदीच्या रुंद पात्रातून ' हर्षवर्धन ' हळूहळू समुद्राच्या दिशेने सरकत होत गलिव्हरच्या भोवती लिलिपुटची माणस दिसावीत तशा आमच्या बोटीभोवती दिसणाऱ्या शिडाच्या होडचा कधीतरी माग राहिल्या. लहान मुलानी खाऊसाठी गोंगाट करावा तसे बोटीभोवती घिरटचा घालणारे डौलदार पांढरे पक्षी कधी तरी थकून परत फिरले.

बगालच्या उपसागराच पाणी गडद निळं. अगदी शाईसारख ! या पाण्याची निळाई एवढी गर्द की, वरच्या आकाशाचा रगही फिकट वाटावा. चहूकडे नजर पोचेल तिथपर्यंत हा निळा सागर पाहिला की या पलीकड कुठतरी जमीन सापडेल यावर विश्वासच बसत नाही वाटत की अथांग सागर अन् त्यावर तरगणार प्लॅस्टिकच्या खेळण्याएवढ हे जहाज यापलीकडे जगात काहीच शिल्लक नसाव बहुधा !

कलकत्ता ते पोर्ट ब्लेअर हा चार दिवसाचा प्रवास त्यातला बहुतेक सर्व वेळ मी ' हर्षवर्धन ' च्या डेकवरच घालवला त्या डेकवरच मला कितीतरी नवे अनुभव भेटले. कितीतरी नव्या जाणिवा ओळखीच्या झाल्या.

पायाखाली आधाराला नेहमीच हजर असणारी जमीन जेव्हा नजरेच्या पकडीतून सुटून जाते तेव्हा किती निराधार वाटतं, हे तेव्हा प्रथम जाणवल.

पुण्या-मुबईच्या उच्च इमारतींच्या जाळचात घुसमटलेला सूर्यास्त पाहायची सवय होती मला सध्याकाळी डेकवर उभी राहिले तर समोर दिसणारा सोनेरी सूर्य अगदी तुरुंगातून नुकत्याच सुटलेल्या कैद्यासारखाच वाटला क्षितिजावर झुकलेल्या त्या सूर्यापासून प्रकाशाची एक पायवाट निघाली होती अन् लाटांवर तरगत माझ्या पायापर्यंत येऊन पोचली होती. वाटत होत की या सोनेरी पायवाटेवरून धावत गेले तर मी क्षितिजापर्यंत पोचेन अन् क्षणात त्या तेजामध्ये विलीन होऊन जाईन

पाहता पाहता तो थकलेला प्रकाशाचा प्रवासी लाटाच्या रेशमी पांघरुणात गुरफटून झोपी गेला अन् मग अंधाराच्या राक्षसान हजार

हातानी आकाशातले रंग पुसून टाकले. शहरी झगमगाटात वावरणाऱ्या तुम्हा-आम्हा लोकांचा अंधाराशी खरा परिचय नसतोच मुळी ! इतर सर्वच गोष्टींप्रमाणे शहरातल्या अंधारातही भेसळ असते–प्रकाशाची !

पण इथं सूर्यास्त झाला अन् मग निळ्या काचेच्या भांड्यात थेंबा-थेंबानं काळा रंग ठिबकत रहावा तसा समुद्रावर अंधार गडद व्हायला लागला. त्या काळ्याकुट्ट अंधाराच्या अजस्त्र देहावर प्रकाशाचा एक ओरखडाही नव्हता. अंधाराच्या त्या राक्षसानं पाहता-पाहता आमच्या जहाजालासुद्धा गिळून टाकलं अन् मग त्या काळ्या साम्राज्यात मी एकटीच राहिले अज्ञात किनाऱ्यावर एकाकी उभ्या असलेल्या रॉबिन्सन क्रूसोसारखी अनोळखी प्रश्नांची अज्ञात उत्तरं शोधत !

असाच प्रवास संथ चालू राहतो मिनीट, तास, तारीख, वार या शब्दांचे अर्थ विसरले जातात निघताना पायात अडखळणारे धागे केव्हाच गळून पडलेले असतात कुठे, केव्हा, कशासाठी असे सारेच प्रश्न संपलेले असतात अन् आता उरतो तो केवळ भोवतीचा शाश्वत निसर्ग आणि त्याच्याशी एकरूप होऊ पाहणारा एक अशाश्वत मानव !

नंतर कधीतरी एका संध्याकाळी डेकवर आवाज उठतो, "जमीन ! जमीन ! जमीन !" .क्षितिजाच्या रेषेवर पाण्यावर तरंगणारा एक काळपट ठिपका दिसत असतो सारे प्रवासी डेकवर जमा होतात अन् त्या अंधुक ठिपक्याकडे उत्सुकतेनं, आनंदानं बघत राहतात खूप दिवसांनी भेटणाऱ्या प्रिय मित्राकडं पाहावं तसं !

आता जो तो आपापल्या घाईत असतो. सामान आवरण्यात, पुढचे बेत ठरवण्यात सगळे गुंग असतात स्थानिक लोकांची अधीरता अन् नवख्या प्रवाशांची उत्सुकता यांचं एक विचित्र मिश्रण तयार होतं चार दिवसांच्या प्रवासात निर्माण झालेले अस्पष्ट मैत्रीबंध आता लाटांवर विरून जातात आता साऱ्यांना जमिनीचे वेध लागलेले असतात

वाटेतली लहान लहान बेटं मागं टाकून जहाज बंदरात शिरलं नारळाच्या झाडांनी झाकलेली बेटं हिरव्या मखमली गालिच्यासारखी पाण्यावर तरंगत असतात या बेटांनी वेढलेला शांत-संथ समुद्र बिलोरी आरशासारखा झगमगत असतो !

पोर्टब्लेअर जवळ जवळ येणाऱ्या बंदराकडे बघता बघता आठवल, या किनाऱ्यावर पोचण्यासाठी किती प्रयास करावे लागले

अदमान-निकोबार बेटावरच्या आदिवासी जमातींवर माहितीपट काढण्याची योजना मी मांडली तेव्हा तिची अवस्था विरोधी पक्षान मांडलेल्या अविश्वासाच्या ठरावासारखीच झाली होती फिल्म डिव्हिजनचे अधिकारी, माझे कुटुंबीय आणि मित्र-मैत्रिणी साऱ्यांनीच, सत्ताधारी पक्षान ठराव फेटाळावा तशी माझी योजना फेटाळून लावली पण माझ्या अगात कोलबस संचारला होता.

अदमानच्या आदिवासी जमाती आजही अगदी प्रथमावस्थेत वावरतात. काही तर अजून अश्मयुगातून बाहेर पडलेल्या नाहीत आणि त्यापैकी कुणालाच बाहेरच्या लोकांशी सपर्क नको असतो ही माहिती सर्वांनाच होती शिवाय ते लोक नरभक्षक असतात असासुद्धा एक समज होता त्यामुळे माझ्या योजनेला विरोध झाला तर त्यात नवल काय ?

पण शेवटी कोलबसाचा विजय झाला अन् फिल्म्स् डिव्हिजनन माझी योजना मजूर केली निघण्याअगोदर अर्थात असख्य सूचना आल्याच

"उगाच कुठे तरी जगलात घुसू नकोस. अनोळखी बेटावर उतरावयाची घाई करू नकोस, तुला अजून खूप फिल्म्स् करावयाच्या आहेत ना ? मग भलत धाडस करू नकोस."– इति फिल्म्स् डिव्हिजनचे मुख्याधिकारी

माझ्या मित्र-मैत्रिणींनी मला सागितलं, "उषा, तुला या फिल्मचे जेवढे पैसे मिळणार असतील तेवढे आम्ही तुला जमवून देऊ, पण हा येडपटपणा करू नकोस तू काय स्वतःला 'सिंदबादकी बेटी' समजतेस की काय ?" आता यावर मी केवळ सद्गदित होण्याव्यतिरिक्त काय म्हणणार ?

निघण्याचा दिवस जवळ आला तशी माझ्या हितचिंतकांनी काही 'प्रेमळ भाकित' ऐकवली

"उषा, ते आदिवासी लोक प्रथम तुझ्या सगळ्या सहकाऱ्यांचा चट्टामट्टा करतील अन् शेवटी तुला 'स्वीट डिश्' म्हणून खातील !" .

" उषा, तू येणार अशी बातमी त्या लोकांना कळली आहे, म्हणून त्यानी चुली पेटवून खास मसाला वाटायला सुरुवात केली आहे!"

अशा अनेक बऱ्या-वाईट आशीर्वादाचं गाठोड खांद्यावर टाकून मी या प्रवासाला निघाले होते. आणि जवळ येणार बंदर बघता-बघता ते सार आठवून पाहत होते.

कॅमेरामन, असिस्टंट कॅमेरामन, युनिट मॅनेजर आणि लाइटमन एवढ छोटस युनिट आणि खूपस सामान घेऊन मी पोर्ट ब्लेअरला उतरले तर अदमानच्या प्रसिद्धी खात्याचे अधिकारी आमची वाट पाहत उभे होते.

स्वातन्त्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर माहितीपट काढण्यासाठी श्री. प्रेम वैद्य आणि त्यांच्याबरोबर श्री. बाळाराव सावरकरही तिथ आले होते ते साऱ्याना सांगायचे, " ही उषा आदिवासी भागात शूटिंग करणार आहे मोठी धाडसी मुलगी !" हे ऐकल की मला अगदी धडकीच भरायची पण अगदी खर सांगायच तर मी काही मोठ धाडस वगैरे करत आहे अस मला कधीच वाटल नाही. शिवाय येण्याआधी एका ज्योतिषान माझा हात पाहून माझी आयुष्यरेषा चागली लाबलचक असल्याच सागितल होत. मग उगीच काय घाबरायच ?

पोर्ट ब्लेअरला उतरल्यावर पहिले सात-आठ दिवस निरनिराळ्या अधिकाऱ्याच्या भेटीगाठीत आणि पुढच्या कार्यक्रमाची आखणी करण्यात गेले अदमानचे प्रसिद्धी अधिकारी श्री. नबियार याच्यावर या कामाची जबाबदारी होती

दुसऱ्या दिवशी अदमानचे लेफ्टनट गव्हर्नर श्री कपानी याची भेट घेतली. माझ्या या प्रयोगाबद्दल ते साशक होते. पण माझा प्रचड उत्साह पाहून त्यांनी मला हिरवा सिग्नल देऊन टाकला काही उपयुक्त सूचना दिल्या आणि सरकारतर्फे सहकार्य मिळेल, अस आश्वासनही दिल.

या साऱ्या कामातून उरलेला वेळ मात्र मी इतर हौशी प्रवाशा-प्रमाणेच इकड-तिकड भटकण्यात घालविला.

सेल्युलर जेल बघायला गेले. स्वातन्त्र्यवीर सावरकर आणि असख्य स्वातन्त्र्यसैनिकाच्या पुण्यस्पर्शान पावन झालेली ही वास्तू इथल्या खड-

तर हालअपेष्टांच्या हकिगती वाचलेल्या अन् ऐकलेल्या. त्यामुळे मनात थोडीशी भीती, थोडासा तिरस्कार आणि थोडीशी भक्ती यांच एक विचित्र मिश्रण.

स्वा. सावरकराना एकातवासासाठी जिथ ठेवल होत ती कोठडी इमारतीच्या शेवटच्या टोकाला आहे जाड लोखडी गजाच्या जाळीन तिला इतर कोठड्यापासून वेगळ पाडलय आजही त्या कोठडीच्या दारावर सावरकराच नाव आणि आतल्या भितीवर त्याचा फोटो आहे

स्वातन्त्र्यपूर्व काळात या तुरुंगावर असलेल भीषणतेच सावट खर म्हणजे केव्हाच विरून गेलय, पण आजही त्या कोंदट, नि शब्द कोठडीत डोकावताना किवा कमानी-कमानींच्या लाबलचक पॅसेजमधून जाताना कुठूनतरी अचानक साखळदडाचा आवाज कानावर पडल्यासारखा वाटतो अन् मी बाहेरच्या स्वच्छ सूर्यप्रकाशाकडे धाव घेते

दुसऱ्या दिवशी आम्ही सिपीघाट कृषी-सशोधन केन्द्राला भेट दिली. एवढ मोठ नाव धारण करणारी ही सस्था मात्र छोटीशीच आहे इथल मुख्य आकर्षण म्हणजे मसाल्याच्या पदार्थांची लागवड लवग, तमालपत्र, जायफळ, काळी मिरी अशा रोपाची पैदास इथ केली जाते. ती छोटी-मोठी रोप आणि त्यांच्या तळाशी साडलेल्या हिरव्या कच्च्या लवगा अन् मिरी बघताना वाटल, या छोट्याशा रोपांनी केवढा इतिहास घडवला या मसाल्याच्या पदार्थांचा पाठलाग करतच पोर्तुगीज आणि इग्रज हिदुस्थानात आले होते ना ? ही रोप नसती तर आपला इतिहास वेगळाच घडला असता का ?

असा विचार करत मी पायवाटेन पुढ निघाले. इतक्यात पलीकडच्या घोळक्यातून अचानक मराठी शब्द कानावर आले अन् माझे पाय आपोआप थाबले मराठी ? इथं ?

मी जरा निरखून पाहिल. अय्या ! पु ल. ? हो, खरच की ! पु ल देशपांडे ! मी पुढ होऊन नमस्कार केला.

" अरेच्चा, तू इकड कशी ? " मी सांगितल माझ्या फिल्मविषयी. त्याना जरा आश्चर्य वाटल असाव. मग त्यांनी मला त्याविषयी आणखी माहिती विचारली बरोबर असलेल्या लोकाशी माझी ओळख करून

दिली, "ही उषा ! आपल्या दत्तोपतांची मुलगी बर का !" प्राथमिक शाळेच्या समारभात अध्यक्षाकडून बक्षीस घेताना वाटायच तसच पुन्हा वाटल मला

अदमानमधली माझी पहिलीच सध्याकाळ मी 'कॉरवाईन्स कोव्ह'मध्ये घालविली इथल्या अर्धचद्राकृती किनाऱ्यावर बसूनच मी अदमानच्या समुद्राचे बदलते रग प्रथम पाहिले म्हणूनच की काय, हे ठिकाण मला खूप आवडल हा इथला एक लोकप्रिय पिकनिक-स्पॉट. सुटीच्या दिवशी इथ लोक सारा दिवस पोहण्यात अन् मजा करण्यात घालवतात. मागच्याच बाजूला 'अदमान बीच रिझॉर्ट' हॉटेल सेवेला हजर आहे तिथ बरेच परदेशी प्रवासी येतात तेही या किनाऱ्यावर तळ ठोकून दिवस-दिवस घालवतात

'चिडिया टापू' हा शहरापासून थोडासा दूर असलेला जगलाचा पट्टा. मुख्यत सुपारीची आणि नारळीची झाड. नाव चिडीया टापू असल तरी चिडिया काही फारशा दिसत नाहीत

प्राणिसग्रहालय, प्राचीन वस्तुसग्रहालय, हस्तकला केंद्र अशी छोटी-मोठी स्थळही पाहण्यासारखी आहेत.

पोर्ट ब्लेअरच्या उत्तरेला एक छोटस बेट आहे त्याच नाव 'रॉस' पूर्वी हे ब्रिटिश कारभाराच प्रमुख ठाण होत त्या राजवैभवाच्या मोडक्या-तोडक्या खाणाखुणा आजही तिथ आढळतात. ढासळलेल्या इमारती, उखडलेली थडगी आणि उद्ध्वस्त बराकी हरवलेल्या सत्तेच्या चिंतनात गुग होऊन वर्षानुवर्षे इथ उभी आहेत. या उदास ऐतिहासिक अवशेषामधले नवे रहिवासी म्हणजे मोर आणि हरणं. ते मात्र इथ स्वच्छद हिडत असतात

पोर्ट ब्लेअर ही अदमानची राजधानी हा केंद्रशासित प्रदेश पोर्ट ब्लेअर हे लहान गावही नव्हे अन् मोठ शहरही नव्हे अशा मधल्याच एका अवस्थेत आहे लहान असल तरी पोर्ट ब्लेअर आवश्यक त्या आधुनिक सुखसोयींनी युक्त आहे वीज, पाणीपुरवठा, टेलिफोन्स, हॉस्पिटल, शाळा, कॉलेज हे सार काही इथ आहे दोन सिनेमागृहे आहेत अन् इथल्या बहुसख्य तरुण पोरींच्या 'दिलकी धडकन्' कुणामध्ये गुतलीय

माहीत आहे ? मिथुन चक्रवर्ती ! लोकवस्ती प्रामुख्यानं दक्षिणी आणि बंगाली लोकांची. त्यामुळे अर्थातच इडली डोसा आणि फिश करी यांची रेलचेल.

'सहजीवन' हा इथल्या समाजाचा गुणविशेष. अनेक प्रांतांमधून आलेले, अनेक भाषा बोलणारे, अनेक धर्ममतानुसार चालणारे लोक इथे एकत्र आले आहेत आणि सुखानं एकत्र नांदत आहेत.

# माणुसकीने ओथंबलेले कारनिकोबार

पाच मिनिटाच्या शॉटसाठी हेमामालिनीनं पाच तास मेकअप-रूममध्ये घालवावेत तसच चाललं होत आमच गेले दहा दिवस पोर्ट ब्लेअरमधल्या लहान-मोठ्या अधिकाऱ्यांची उलटसुलट निर्णय आणि बिनतारी संदेशाची देवाण-घेवाण याच्या भोवऱ्यात मी गटांगळ्या खात होते.

आणि मग एक दिवस रात्री अचानक प्रसिद्धी खात्याचा अधिकारी मला सांगायला आला, "उद्या सकाळी जाणाऱ्या जहाजावरून तुम्हाला कार-निकोबारला पोचवण्याची व्यवस्था केली आहे" सर्कसवाल्यानी एका रात्रीत तबू गुडाळावा तसा आम्ही आमचा मुक्काम आवरला अन् भल्या सकाळी डोळे चोळत मी माझ्या युनिटसह हॅडोच्या धक्क्यावर पोचले तिथ 'अकबर' जहाज उभं होत. मद्रासला जाणार हे प्रवासी जहाज आम्हाला त्या दिवशी सध्याकाळपर्यंत कारनिकोबार बेटावर पोचविणार होत सार्‍या सामानाची व्यवस्था लावून मी माझी केबिन गाठली काल रात्री न मिळालेल झोपेच रेशन आज वसूल करून घ्याव अशा सुखद विचारात मी असतानाच आमचे युनिट मॅनेजर मला शोधत आले. म्हणाले,

"तुमच्या तिकिटावर वैद्यकीय तपासणीचा शिक्का मारून आणायला विसरलात ना?"

गोष्ट खरीच होती. जहाजावर चढण्याआधी अस वैद्यकीय प्रमाण-पत्र मिळवण आवश्यक होत. पण खर सांगायच तर हा एक विनोदच असतो आत्ताचच पाहा ना, मी पर्समधून माझं तिकीट काढल, अन् जहाजावरून उतरून मी वैद्यकीय अधिकाऱ्याच्या टेबलाजवळ पोचले. त्यान आपल्या क्ष-किरणयुक्त नजरेन माझ्याकडे एकदाच पाहृचल अन् माझ्या तिकिटावर 'ऑल वेल'ची मुद्रा उठवून दिली एका कृपाकटाक्षात माझ्या आरोग्याचा वेध घेणारे हे महाशय पाहून मी श्रद्धायुक्त अत करणाने त्याचे आभार मानले आणि त्यानीही "वत्सा, तुजप्रद कल्याण असो" अशा आविर्भावान माझ तिकीट माझ्या हाती दिल.

ते घेऊन मी पुन्हा एकदा घाईघाईन शिडी चढायला लागले तेव्हा मला जाणवल की जहाजाची शिडी ही पडण्यासाठी जास्त उपयुक्त असते आणि त्या अरुद फळीवर आडवे ठोकलेले रूळ पायाना आधार देण्यापेक्षा अडथळ्यासाठी उपयोगी पडतात ही अडथळ्याची शर्यत जिंकून मी डेकवर पोचले. नतर केव्हा तरी जहाजाची शिडी उतरली, दोर सुटले, भोंगा वाजला अन् अश्वमेधाच्या घोड्याबरोबर जाणाऱ्या सैन्याप्रमाणे आम्ही अकबर जहाजावरून शूटिंगच्या मोहिमेवर निघालो.

या मोहिमेच पहिल तोरण बांधायच होत कारनिकोबार बेटावर, एकच इजिन चालू ठेवून 'आस्ते कदम' करत आमच जहाज दिवसभर चालत चालत होत. सध्याकाळ व्हायला आली तशी मी दहा वेळा डेकवर हिंडून आले पण बेट काही येईना डेकच्या उबरठ्यावर एखाद भाड पालथ घालावं की काय असा विचार करत मी केबिनमध्ये बसले होते. सध्याकाळच्या आकाशाचे बदलणारे रग बघता बघता मी केव्हा निद्राधीन झाले ते मात्र मलाही कळल नाही

एकाच इजिनावर चालणार आमच लगड जहाज समुद्रात भरकटलं होत अन् वादळाच्या जोरान वाजूच्या खडकांवर धडका देत होत अचानक मी डोळे उघडले तेव्हा मला जाणवलं की या धडका खडकावरच्या नसून माझ्या केबिनच्या दारावरच्या आहेत. मी धडपडत उठून दिवा लावला अन् दार उघडल. समोर केबिन-स्टुअर्ड उभा होता. "सॉरी मॅडम, पण आपण कारनिकोबारला पोचलो आहोत. तुम्हाला आता इथ

उतरायला हवं !"

आत्ता ? इथं ? मी घड्याळाकडे पाहिलं. रात्रीचे साडेबारा वाजले होते केबिनच्या खिडकीतून बाहेरचा काळोख दिसत होता, अशा भलत्याच वेळी या अनोळखी बेटावर उतरायच ? माझ्या या भीतीच एक मोठ कारण होत कारनिकोबार बेटावर मोठ्या जहाजांसाठी बदर बाधलेल नाही. त्यामुळे जहाजच किनाऱ्यापासून चार-पाच मैल दूर समुद्रात उभी राहतात मग बेटावरचे लोक मोटर लाँचेस घेऊन येतात, जहाजाच्या शिडीवरून त्या लाँचमध्ये उतरायच आणि किनारा गाठायचा

कुणाच्या घरी जायचं तर "तुमच्या बिल्डिंगमध्ये लिफ्ट आहे ना ?" अशी चौकशी करणाऱ्या काही शहरी लोकांच्या दृष्टीन हा सारा प्रकार सर्कशीत शोभणारा होता त्यातून मध्यरात्री, भरतीच्या वेळी ही जीवघेणी कसरत करायची म्हणजे रस्त्यावर खेळणाऱ्यान प्रुडेन्शिअल कपसाठी मैदानात उतराव तसच होत आमच्याकडे सामानही अगदी प्रचड होत कॅमेरा, लाइटस, फिल्म या साऱ्याच्या मोठमोठ्या लोखडी पेट्या आणि आमच्या सर्वांच्या सुबक सूटकेसेस वर्गकलह विसरून एकत्र नादत होत्या

मी घाईघाईने डेकवर आले बाहेर मिट्ट काळोख सैतानासारखाच घुमणारा वारा, रानटी घोड्यासारख्या उधळलेल्या लाटा या साऱ्याच्या साथीन डिस्को नृत्य करणारी जहाजाची लोंबती अरुद शिडी आणि त्या शिडीच्या दुसऱ्या टोकाखाली खोल पाण्यात एक मोटारलाँच ! माकडी-णीच पिल्लू आईला घट्ट बिलगून बसत तशी ती नाव आमच्या बोटीला चिकटली होती

अखेर सर्वांच्या मदतीन आमच अवजड सामान नावेत उतरवल गेल आणि मीही कशीबशी शिडी पार करून नावेत उडी मारली.

त्यानतर दहा मिनिटात आम्ही कारनिकोबारच्या लहानशा लाकडी धक्क्यावर पोहोचलो समुद्रात दूर राहिलेल जहाज आता मत्स्यकन्येच्या झगमगत्या राजवाड्यासारख दिसत होत आणि मी इकडे रात्रीच्या गारठ्यात कुडकुडत एका लाकडी ओंडक्यावर बसून आम्हाला या संक-

टात टाकल्याबद्दल आख्ख्या शिपिंग लाइनचा मनातल्या मनात 'सत्कार' करत होते.

आता पुढे काय ? हा प्रश्न माझ्यापुढे होता. आसपास लोकवस्ती दिसत नव्हती मग बस किंवा टेलिफोन सापडण्याची आशाच सोडा. तेव्हा या धक्क्यावर बसूनच रात्र घालवावी लागणार हे उघड होत. मला वाटल, येताना आपण टाळ आणि मृदुग आणले असते तर आता या समुद्रकिनारी अभग तरी म्हटले असते. अर्थात इतक्या सस्कृतिप्रधान मन स्थितीत आता इतर कुणीच नसल्यानं मी काही न बोलता ओंडक्यावर बसून राहिले. तिथच एका बाजूला आमच्या सामानाचा डोंगर रचला होता आणि माझे चार सहकारी चेहऱ्याची प्रश्नचिन्ह करून हॅम्लेटच्या भाईबदासारखे आसपास उभे होते.

"अरे उषाजी, आप इस वक्त यहाँ क्या कर रही है ?" हा प्रश्न कानावर पडला आणि तो अनोळखी पुरुषी स्वर मला त्या क्षणी दूरदर्शनवर निवेदिकेच्या आवाजापेक्षाही जास्त गोड वाटला. अनोळखी चेहऱ्यावर गुडाळलेला मफलर दूर झाल्यावर ओळख पटली. हे श्री युसुफ जाडवट म्हणजे अदमान-निकोबारमधले टाटा-बिर्लाच ! या भागातल्या बऱ्याचशा व्यापारामध्ये यांच्या सहकारी सोसायटीचा सहभाग असतो, तेव्हा याना इथले सहकार सम्राट म्हणायला हरकत नाही.

आताही त्यानी लगेच आमच्याशीही सहकार करायची तयारी दाखवली. आमच्यासाठी वाहनाची व्यवस्था करून आम्हाला सरकारी अतिथिगृहात पोचवल आणि मग त्याच्या गाडीचा आवाज वातावरणात विरून जाण्याआधीच मला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून आजूबाजूला नजर टाकली तेव्हा दिसला समोरच्या कुपणापलीकडे पसरलेला अथाग निळा समुद्र वाटल, हे मधल तारांच कुपण काढून टाकल तर या खटयाळ लाटा हळूच इथ अगणात भोंडला खेळायला येतील त्या दृश्याकडे पाहत सकाळची सोनेरी उन्ह अगावर घेत मी व्हराडयात चहा पीत बसले होते

कारनिकोबार हे लहानस साधारण वर्तुळाकार बेट. इथले रहिवासी निकोबारी लोक हे साधारणत. मगोलियन लोकासारखे सपाट

चेहऱ्याचे आणि बारीक डोळ्याचे, पिवळसर वर्णाचे आणि काळ्या केसाचे. निकोबारी पुरुष फारसे उंच नसले तरी पीळदार शरीरयष्टीचे असतात हे लोक कुत्र्याला आपला मूळ पुरुष मानतात आणि म्हणूनच त्याच्या पारंपरिक वेशामध्ये प्रत्येक पुरुष एक लांब कापड शेपटीसारख कमरेमागे बांधतो.

या बेटाच पूर्वीच नाव 'पु' ४९ चौरस मैलांच्या या बेटाची सध्याची लोकसंख्या साधारणत पंधरा हजारांची आहे सध्या इथले बहुसंख्य लोक ख्रिस्ती धर्माचे आहेत. त्यामुळे या छोट्या बेटावर लहान-मोठी चर्चेस आढळतात

निकोबारी झोपड्या पाहण्यासारख्या असतात. चार लाकडी खांबांवर बांबूचा एक प्लॅटफॉर्म बांधतात आणि मग त्यावर गोलाकार झोपडी बांधतात ती गवतान शाकारलेली असते व तिला दारं, खिडक्या नसतात, पण खाली जमिनीऐवजी बांबूची जाळी असल्यान प्रकाश आणि हवा मिळते खाली एक शिडी असते आणि बांबूच्या जाळीतच एक चौकोनी वाट बाहेर जाण्यासाठी ठेवलेली असते. झोपडीचा अंतर्भाग अगदी थंड आणि स्वच्छ असतो

झोपडीखालच्या चार खांबामध्ये एखादा छोटा झोपाळा बांधलेला नेहमीच आढळतो तसंच बांबून विणलेली मोठी लांब-रुंद खाटही तिथं असते या जागेचा उपयोग बंगल्यातल्या दर्शनी हॉलसारखा करतात

अशा ३०–४० झोपड्यांची एक वस्ती असते आणि या वस्तीचा एक पाटील असतो. त्याला कॅप्टन म्हणतात अशा १९-२० वस्त्या या बेटावर विखुरलेल्या आहेत

डुक्कर हा याचा आवडता पाळीव प्राणी. ज्याच्याकडे डुकराची संख्या जास्त तो श्रीमंत माणूस अशाच एका गृहस्थाकडे पाळलेल्या डुकरांना रोज जवळजवळ पाचशे नारळ खायला घातले जातात, असं कळल डुकराच रक्त अंगाला लावल तर सारे त्वचारोग बरे होतात, असा एक समज

इथल्या जंगलात पंडानस नावाच एक फळ सापडत साधारणपणे अननसासारख दिसणारं. पण बरच मोठं हे फळ म्हणजे या लोकांचा

मुख्य आहार डुकराचं मास, मासे, जंगलातली कंदमुळं आणि नारळ यावरच वर्षानुवर्षं याची गुजराण चालत असे पण आता ते तांदूळ, गहू, डाळी आवडीनं खायला लागलेत जंगल साफ करून भाजीपाल्याची लागवड करायचा प्रयत्नही सुरू आहे.

नारळ ही इथली निसर्गसंपत्ती या छोटयाशा बेटावर अक्षरशः लाखो नारळी उभ्या आहेत खोबरं किसून त्यापासून तेल काढण्याचा उद्योग घरोघरी चालू असतो सुपारी, केळी, पपई याचीही देवाणघेवाण चालू असते निकोबारी पुरुष आणि स्त्रिया नेहमीच एकत्र बसून तंबाखू खाताना दिसतात.

नावांच्या शर्यती लावणे हा यांचा आवडता छंद. या नावा झाडाच्या एका मोठ्या बुध्यातून पोखरून तयार केलेल्या असतात आणि त्यावर रंगीबेरंगी सजावट केलेली असते. अपार्टमेंट हाऊसखाली कार पार्क असावं तशाच घराच्या खाली या नावा माडून ठेवलेल्या असतात. आणि आपण एखाद्या मर्सिडिस गाडीची घ्यावी तेवढीच काळजी हे लोक आपल्या नावेची घेतात.

नवीन नाव तयार झाली की ती समुद्रात सोडण्याआधी तिच्यावर डुकराचं किंवा कोंबड्याचं रक्त शिंपडतात. आणि मग शर्यत सुरू होते. या शर्यती मोठ्या उत्सवात सर्व खेडी एकत्र येऊनही करतात शर्यती-नंतर कुस्तीचे, नाचगाण्यांचे कार्यक्रम होतात या वेळी अर्थातच खाण्याची आणि 'पिण्याचीही' चंगळ असते

सहजीवन हे इथल्या समाजाचं वैशिष्टय प्रत्येक वस्ती एका मोठ्या कुटुंबासारखीच असते आणि त्या वस्तीचा कॅप्टन घरातल्या कर्त्या पुरुषाप्रमाणे सगळ्यावर करडी नजर ठेवून असतो

वस्तीपासून जरा दूर समुद्रकिनारी एखादी शांत जागा शोधून, तिथं दोन झोपड्या शेजारी शेजारी बांधलेल्या आढळतात यापैकी एक असतं जन्मगृह, नवीन अर्भकाचा जन्म होण्याआधी काही दिवस गर्भवती स्त्री आणि तिचा पती यांना या झोपडीत राहण्यासाठी पाठवतात, तिथंच प्रसूतीची व्यवस्था केली जाते. मूल जन्माला आल्यानंतरही काही दिवस ते पति-पत्नी या झोपडीतच राहून, त्याचं संगोपन करतात या काळात

त्यांना आवश्यक ते अन्न वगैरे पुरविण्याची जबाबदारी अर्थातच त्यांचे वस्तीतल्या शेजाऱ्यावर असते.

या परंपरेमागे विशिष्ट कारण आहे मुलाच्या जन्माच्या वेळी आणि नंतर काही दिवस चालणाऱ्या गोंधळाचा त्रास गावातील इतरांना होऊ नये व गावात काही प्रदूषण अथवा आजार असल्यास नवजात अर्भकाला त्याची लागण होऊ नये, असे दोन हेतू यात साधले जातात

बदलत्या काळानुसार या लहानशा बेटाचही रूप हळूहळू बदलायला लागलं बहुतेक सर्व वस्त्यांमध्ये विजेचे दिवे लुकलुक करायला लागले आहेत बेटाच्या भोवती एक चक्राकार डांबरी खडक तयार झाला आहे सहकारी सोसायटीची दुकान आधुनिक डबाबाटल्याचा संसार मांडून उभी आहेत ज्यांच्या पूर्वजाना कुठलीच लिपी माहीत नव्हती, त्यांची मुल आता शाळेत 'ए बी सी डी' गिरवायला लागली आहेत, अन् मधल्या सुटीत फूटबॉल, व्हॉलिबॉलसारखे खेळ खेळतात गवताच्या झोपडीत फ्रीज आणि स्टीरिओ याची स्थापना झालीय

पण आधुनिकतेच्या या बुलडोझरन अजून इथल्या माणुसकीला जमीनदोस्त केलेल नाही. कुठल्याही वस्तीत, कुठल्याही घरात मला आपुलकीची उणीव भासली नाही अगदी रस्त्यान जाणारी अनोळखी मुल-मुलीसुद्धा हसून, हात हलवून आमच स्वागत करायची. कुणाच्या घरातली एखादी वस्तू मला आवडल्याच दिसल तर ती लगेच मला भेट देण्याची त्यांची सहज तयारी असायची एकदा एका कॅप्टनच्या घरी असलेल्या स्टीरिओची सजावट मला आवडली, तेव्हा त्यानी तो ॲम्प्लीफायरच उचलून माझ्यापुढे ठेवला, दुसऱ्या एका कॅप्टनच्या भावाने मला मराठीत "कसा काय ? छागला हाय ना ?" अस विचारून माझी चक्क विकेट घेतली होती ही बहुतेक माणस तशी मोकळ्या अघळपघळ स्वभावाची, त्यामुळ कुठल्याही वस्तीत शूटिंग असल तरी त्याला पाहता पाहता जत्रेची कळा यायची.

कलियुगात न शोभणारा प्रामाणिकपणा इथ अजूनही आढळतो. दुसऱ्याच्या हद्दीत पडलेले नारळ गुपचूप लपास करण्याची कला अजून या लोकाना साधली नाही, त्यामुळ सर्किट हाऊसवरच्या माझ्या खोलीला

कुलूप लावण्याची जरूरी मला इथे कधीच वाटली नाही किंवा समुद्र-किनारी चांदण्यात भिजत एकटंच हिंडताना मला कधी भीतीही वाटली नाही 'आम्हाला इथे काही कामच नाही' ही इथल्या पोलिसाची व्यथा आहे !

# दोन चिमुकल्या बेटांची रोमहर्षक भेट

अंदमान-निकोबारच्या बेटांमध्ये वाहतुकीचं साधन म्हणजे जहाजं. के एस एस येरवा हे असंच जहाज म्हणजे आपली चर्चगेट–विरार फास्ट लोकल असते ना तसंच !

या जहाजाचे कॅप्टन प्रभाकरन याना एक दिवस पोर्ट ब्लेअरच्या सचिवालयातून आग्रहाचं निमंत्रण आलं तिथं गेल्यावर मुख्य सचिव सागर त्याला म्हणाले, "उषा सध्या कार-निकोबार बेटावर आहे. तिला चौरा, तरासा वगैरे बेटावर शूटिंग करायला जायचं आहे तिला तिथं घेऊन जाण्याची जबाबदारी तुमची !"

ही असली वाऱ्यावरची वरात कॅप्टनना मुळीच मान्य नव्हती येरवा हे मोठं जहाज चौरा वगैरे लहान बेटावर कधीच जात नाही केवळ माझ्या हट्टापायी त्याना जहाजाचा नेहमीचा मार्ग बदलायला लागणार होता. त्यातले अनेक संभाव्य धोकेही त्याना जाणवत होते.

इतर वेळी त्यानी ही कल्पना झुरळ झटकावं अशी सहज झटकून टाकली असती, पण स्वतः कॅप्टन आणि त्याच्या जहाजावरचे इतरही अधिकारी या साऱ्याशी माझी चांगली मैत्री होती, त्यामुळ त्याना एकदम व्हेटो चालवता येईना

त्याच्या या नाराजीला कारणंही बरीच होती एकतर येरवा जहाज कधीच तिथं जात नसल्यामुळे तिथल्या समुद्रतळाची त्यांना नीट माहिती नव्हती चौरा–तरासा बेटांच्या आसपास समुद्रात खूपच मोठ-मोठे खडक आहेत पाण्यात लपलेले हे विक्राळ राक्षस केव्हा एखाद्या

जहाजाची लगडी मोडतील त्याचा काय नेम ? शिवाय या बेटाच्या भोवतीचा समुद्र फार लहरी आहे एखाद्या फिल्मस्टारसारखेच त्याचेही 'मूड' सतत बदलत असतात असली विचित्र कुडली माडल्यावर तिची अशुभ फळ सांगण्यासाठी ज्योतिषाची काय गरज ? "चौराच्या समुद्रात नऊ नऊ मीटर उचीच्या लाटा येतात अन् त्यात होड्या गायबच होतात" अशीही एक 'खुशखबरी' आम्हाला निकोबारच्या डी.एस पीं नी ऐकवली होती त्यामुळ साहजिक माझ्या युनिटमधल्या लोकाच्या उत्साहाच एव्हाना आइस्क्रीम झाल होत

"तुमचं ठीक आहे हो बाई ! पण आमच्यावर बायकामुलांची जबाबदारी आहे !" अशी वाक्य वारंवार माझ्या कानावर पडायला लागली होती. पूर्वी बाउटी जहाजाच्या खलाशानी ताहिती बेटावर कॅप्टनविरुद्ध बड पुकारल होत. तसच चौरा बेटामुळ माझ्या युनिटमध्ये बड होण्याची चिन्ह दिसायला लागली होती, पण मीही अगदी 'इच इच लढवू' असा पवित्रा घेतल्यानं साऱ्याचा नाइलाज झाला

ठरल्याप्रमाणे एक दिवस 'येरवा' कार–निकोबारच्या उबरठ्यावर येऊन उभ राहिल आम्ही गाशा गुडाळला आणि पुन्हा एकदा पूर्वीप्रमाणेच सर्कस करीत लोंबत्या शिडीवरून आम्ही जहाजावर चढलो

या जहाजावरचे सारे अधिकारी मला फूलनदेवी म्हणायचे आतासुद्धा त्यानी 'फूलनदेवीचा फेरा आला' अशाच शब्दात माझ स्वागत केलं

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही 'चौरा' बेटाजवळ पोचलो अर्थात या विधानातल्या 'जवळ' या शब्दाला फारसा अर्थ नाही, कारण आमचं जहाज बेटापासून चांगलं पाच-सहा मैल लांब उभ होत अर्थात 'उभ' होत म्हणण्यातही फारसा अर्थ नाही. कारण इथल्या अनोळखी समुद्रात नांगर टाकण शक्य नव्हत आणि इजिन बद करून एका जागी उभ राहाणही धोक्याच होतं त्यामुळ आम्ही बेटावर जाऊन परत येईपर्यंत समुद्रात शतपावली करत राहाण एवढच 'येरवा'च्या हाती होतं

कॅप्टन आणि चीफ इजिनीअर तिवारी याच्याबरोबर मीही जहाजाच्या ब्रिजवर उभी राहून बेट दुर्बिणीतून न्याहाळत होते तिथपर्यंत

पोचायचं कसं ?

बेटावर किनाऱ्यावर लहानमोठ्या आकृत्यांची धावपळ दिसायला लागली होती गावातही उत्साही मंडळी हे आक्रीत बघायला चौपाटी-वर जमलेली दिसत होती जहाजानं भोंगा वाजवून आमन्त्रण दिल्यावर त्यातल्या काही लोकांनी एक-दोन होड्या पाण्यात लोटल्या आणि जोर-जोराने वल्ही मारत साधारण अर्ध्या तासात ते जहाजापाशी पोचले. मी खाली जायला निघाले तेवढ्यात कॅप्टनने तोफ डागली– " हे बघ उषा, या होड्यांमधून जाताना बुडालीबिडालीस तर त्याची जबाबदारी आमच्यावर नाही शिवाय तू या बेटावर असताना समुद्राचा मूड बदलला तर मी तुला इथच सोडून सरळ निघून जाईन सांगून ठेव-तोय ! " माझ्या लहरीखातर जहाजाचा नैवेद्य दाखवायची त्याची तयारी नव्हती त्यामुळे ' भोंगा ऐकलास की ताबडतोब परत ये ' असा दम देऊन त्यानी माझी पाठवणी केली.

कार-निकोबारला शिडीवरून उतरताना खाली निदान एक बऱ्या-पैकी मोटारबोट होती आता इथ होतं केवळ दोन-अडीच फूट रुंदीचं लांबट होडगं पाऊल वाकडं पडलं की माणूस रसातळाला जातो, असं आजपर्यंत ऐकलं होतं त्याचं शब्दशः प्रात्यक्षिक इथ पाहायला मिळणार असं वाटत होतं, पण एव्हाना मी कसरतपटू झाले होते

होडग्यात युनिट आणि सामान भरल्यावर पुन्हा एकदा जोर-जोरात वल्ही मारत आम्ही किनाऱ्याकडे निघालो आमचे नावाडी म्हणजे जेमतेम १३–१४ वर्षांची दोन पोरंच होती. पण वाटेत येणाऱ्या खडकाना सफाईनं खो देऊन त्यानी किनाऱ्याचा भोज्या गाठला

समोरच गवताच्या गोल झोपड्या दिसत होत्या. किनाऱ्यावर गोळा झालेली पोरटोरं डोळ्याच्या दुर्बिणी करून आम्हाला न्याहाळत होती पलीकडे होडी बांधण्याच्या कामात गुतलेल्या माणसाचे हात थांबले होते झोपडीखालच्या खाटेवर बसलेली बायामाणसं या शहराच्या पाव्हण्याकडे डोकावून पाहात होती. मी होडीतून उतरून किनारा गाठला अन् गावाकडेच मोर्चा वळवला.

चौरा हे बेट अगदीच चिमुकलं आहे. अवघ्या अडीच मैल क्षेत्र-

फळाच्या या बेटावर साधारण १३०० लोक राहतात.

हे लोक निकोबारी असले तरी कारनिकोबारच्या लोकांइतके सुधारलेले नाहीत तेवढे सुखवस्तूही नाहीत शिवाय त्यांची बोलीभाषाही वेगळी आहे अस असल तरी निकोबारी संस्कृतीत चौरा बेटाच एक खास महत्त्वाच स्थान आहे त्याच एक कारण म्हणजे इथ बनवली जाणारी मातीची भांडी चाकाचा उपयोग न करता केवळ हातान थापून ही भांडी बनवतात. नंतर उन्हात सुकवून आणि छोटया चुलीत भाजून ती पक्की करतात आश्चर्य म्हणजे मोठमोठे हंडे व पातेलीसुद्धा अशीच हातावर थापून तयार केली जातात

चौरा बेटावरची ही भांडी निकोबारी लोक फार पवित्र मानतात आजच्या आधुनिक काळातही सणासदीचा स्वयपाक 'मेड इन चौरा' भांड्याशिवाय होऊ शकत नाही त्यामुळे चौराच्या घराघरात बाया-माणस फावल्या वेळात तंबाखू चघळत माती थापत बसलेली दिसतात.

चौरा हे निकोबारचं डेट्रॉईट! छोटया मोठ्या होडया तयार करण्याचा व्यवसाय इथ जोरात चालतो दरवर्षी या नव्या होड्या घेऊन हे लोक आजूबाजूच्या बेटांवर जातात आणि त्यांची विक्री कर-तात आपण जशी फियाट वापरतो, तसे निकोबारी लोक होडया वापर-तात त्यातूनही चौरा बेटावर बनवलेल्या होडयाना भाव खूप असतो त्यामुळ चांगला घसघशीत सौदा होतो.

आश्चर्य म्हणजे या दोन्ही धंद्यासाठी लागणारा कच्चा माल चौरा बेटावर मिळत नाही. भांड्यासाठी लागणारी चिकण माती इथ सापडत नाही आणि होडी करण्यासाठी लागणारे जाड बुध्याचे वृक्षही इथ दिसत नाहीत या दोन्ही वस्तू हे लोक शेजारपाजारच्या बेटावरून आयात करतात आणि नंतर त्याच्या वस्तू बनवून पुन्हा त्याच शेजाऱ्या-कडे 'मेड इन चौरा' असा शिक्का मारून निर्यात करतात अस मी

---

निकोबारींच्या मनात चौरा या नावाभोवती एक रहस्यमय वलय आहे त्याच कारण म्हणजे चौराची जादू! प्राचीन काळापासून इथले मांत्रिक त्यांच्या दैवी शक्तीबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यामुळ अडल्यापडल्याला

त्यांच्यापुढे नाक घासावं लागतं घरातल्या धार्मिक विधींसाठी त्यांचेच पाय धरावे लागतात मुलगा वयात आला की त्याला चौरा बेटावर नेऊन धार्मिक विधी केल्याशिवाय त्याची सोयरीक जुळत नाही. अर्थात आता नव्या धर्मप्रसारामुळे अशा मौजीबंधनाला बऱ्याचदा फाटा दिला जातो, पण म्हणून चौराच्या खास महत्त्वाला काही धक्का पोचत नाही

कार-निकोबारसारखी निसर्गसंपत्ती इथं नाही सतत खवळलेल्या समुद्रामुळे सागर संपत्तीचीही चणचण. एवढंच काय, प्यायला भरपूर पाणीसुद्धा नाही.

हे लोक मोठे कुशल नावाडी असतात मी किनाऱ्यावर उभी होते तेवढ्यात ८–१० वर्षांच्या दोन मुलांनी एक लहान होडी पाण्यात ढकलली पत्र्याची दोन-तीन पिंपं घेऊन एक बाई त्या होडीत बसली होती मोठमोठ्या लाटा होडीला किनाऱ्याकडे ढकलत होत्या, पण त्या मुलांनी बिनदिक्कतपणे शिड उभारली आणि वल्ही मारायला सुरवात केली

शेजारी उभ्या असलेल्या एकाला मी विचारले, "कुठं चालले हे ?"

"शेजारच्या बेटावर !"

"केव्हा पोचणार ?"

"उद्या सकाळी !"

"ही दोन मुलं या छोट्याशा होडीत बसून रात्रभर लाटांशी झुंजत राहणार ? पण कशाला जात आहेत हा एवढा धोका पत्करून ?" त्या माणसाला माझ्या अडाणीपणाची कीव आली असावी त्यानं शांतपणे मला सांगितलं, "कशाला म्हणजे काय? पाणी आणायला." मी आश्चर्यानं वळून पाहिलं तोवर ती होडी ठिपक्याएवढी झाली होती

या पाणीदार प्रश्नावर उपाय म्हणून काही वर्षांपूर्वी इथं एक उंच मोठी टाकी बांधली यात साठलेल्या पावसाच्या पाण्यानं या लोकांची तहान भागेल असा अंदाज होता, पण आपल्याला असं हातोहात चकव-लेलं निसर्गाला मान्य नसावं. ही टाकी पूर्ण झाली अन त्यात पावसा-ऐवजी वीजच पडली मंत्रतंत्रात गुरफटलेल्या लोकांना हा सैतानाचा

संदेशच वाटला असल्यास त्यात नवल नाही ? त्यांनी ताबडतोब त्या टाकीला वाळीत टाकल.

चौरा हे पूर्वी निकोबार बेटाच्या व्यापाराच महत्त्वाच केंद्र होत परतु आता या बेटाच महत्त्व कमी व्हायला लागलय नव्या व्यापारी मार्गापासून दूर असल्यान आणि प्रतिकूल समुद्रामुळ या बेटाचा बाहेरच्या जगाशी संबध तसा कमीच, त्यामुळ सुधारणेच वार अजून इथ फारस पोचलेल नाही पण हळूहळू परिस्थिती बदलते आहे. आता इथे एक छोटीशी शाळा उघडली आहे. एक प्राथमिक आरोग्य केंद्रही आधुनिक औषध द्यायला सज्ज झाल आहे सहकारी सोसायटीची एक शाखा इथल्या लोकांच्या प्राथमिक गरजा पुरवायला उभी राहिली आहे.

कॅमेरा खांद्यावर टाकून दिसेल त्या दृश्याची 'शिकार' करत करत आम्ही कितीतरी वेळ असेच हिंडत राहिलो अचानक येरवाची हाक कानी पडली अन् मी 'पीछे मूड' असा आदेश देऊन परत फिरले

चौराच्या लोकांनी भेट दिलेले नारळ, केळी, खोबरेल तेलाच्या बाटल्या आणि आमचे कॅमेरे हे सार काखोटीला मारून किनारा गाठायला बराच वेळ लागला. पिंजऱ्यात अडकलेला वाघ जसा अस्वस्थपणे इकडे-तिकडे फेऱ्या घालत डरकाळ्या फोडत असतो, तसच आमच जहाज समुद्रात फेऱ्या घालत होत अन् अधूनमधून भोंगा वाजवत होत.

आम्ही जहाजावर चढलो नांगर उचलला गेला अन येरवान 'क्विक मार्च' सुरू केल मी जहाजाच्या ब्रिजवर पोचले अन माग वळून पाहिल. दूर सरकणाऱ्या चौरा बेटाच्या गोल गवती झोपड्या आता दिवाळीतल्या किल्ल्यासारख्या दिसत होत्या.

तरासा हेही असच एक छोट बेट, पण चौरापेक्षा मोठ चौतीस मैल क्षेत्रफळाच्या या बेटाच मूळ नाव लुरू या बेटावर साधारण चौदाशे लोक राहतात यांची भाषा चौरा भाषेपेक्षा वेगळी आहे हे बेट इतर बेटासारख सपाट अन् रेताड नाही इथली जमीन खडकाळ आहे. लहान-मोठ्या टेकड्या आहेत त्यामध्ये एक 'महाराणी पीक' नावाच शिखर-सुद्धा आहे

इथले निकोबारी लाठ्याचे खेळ चागले खेळतात. लाब शेपटीचा

परंपरागत पेहराव करून अन् डोक्यावर पानाचे टोप घालून लढाईला सज्ज झालेले हे शिलेदार जगातल्या कुठल्याच सैन्यात शोभणारे नसले तरी तेवढेच चपळ आणि कुशल होते

तरासावरच काम सपवून आम्ही किनाऱ्यावर आलो तोवर लाटाचा जोर बराच वाढला होता. दूरवर उभ असणार जहाज पुनः पुन्हा साद घालत होत

आमच्या नावाड्यानी होडग पाण्यात लोटल अन् त्या अवखळ लाटानी बघता बघता आमच्या छोट्याशा होडीचा फूटबॉल करून टाकला होडीचा तोल सांभाळण्यासाठी लावलेला आउटरीगर खिळखिळा झाला होता त्यामुळे तोल ढळलेली आमची होडी झोकाड्या खात होती एक नावाडी पत्र्याच डबड घेऊन होडीत भरणार पाणी उपसत होता उन्मत्त जगली घोड्यासारख्या लाटा अगावर धावून येत होत्या.

वारा आणि लाटा यानी सगनमत करून आमच्या होडीला उलट्या दिशेला जहाजापासून दूर ढकलायला सुरवात केली होती कितीही जोरात वल्ही मारली तरी दिशा बदलून जहाजाकडे जाण नावाड्याना जमत नव्हत

हा हुतुतूचा खेळ कॅप्टन आणि इतर लोक जहाजावरून पाहत होते आमची हार होतेय हे पाहताच कॅप्टनन जहाज वळवून उलट दिशेन आमच्या जवळ जवळ आणल. एव्हाना आमची होडी मुक्त हरिणीप्रमाणे वागडत होती पुढे पुढे येणाऱ्या या प्रचड हत्तीच्या पायाखाली ती तुडविली जाईल की काय अशी दुष्ट शका माझ्या मनात डोकावली पण सुदैवान जहाजाचे कॅप्टन आणि आमचा नावाडी या दोघाचे अदाज अचूक ठरले आणि शेवटी एकदाचे आम्ही त्या लोबत्या शिडीवरून विळात घुसणाऱ्या सशासारखे घाईघाईने जहाजात शिरलो.

# घनदाट जंगलातले स्वच्छंदी निसर्गपुत्र

आता आम्हाला वेध लागले होते ग्रेट निकोबारचे त्यामुळे वाटेत भेटणाऱ्या लिबू-टिबू बेटाना कधी नुसतच 'हॅलो' म्हणून, तर 'फिर मिलेंगे' अस आश्वासन देऊन आम्ही पुढ चालत राहिलो

ग्रेट निकोबार हे या भागातल दक्षिणेकडच सर्वांत शेवटच बेट. कधी तरी पधरा-वीस दिवसातून एकदा 'व्हिजिट'ला येणार जहाज हाच या बेटाला बाहेरच्या जगाशी जोडणारा एकमेव दुवा त्यामुळे मेघदूतातल्या विरहिणीइतक्या उत्कठेन इथली माणस जहाजाची प्रतीक्षा करत असतात जहाजाच्या स्वागताला धक्क्यावर जमणारी गर्दी कुठल्याही पक्षाच्या पुढाऱ्याला हेवा वाटावा अशी असते.

आम्हाला इथं सोडून 'येरवा' परत फिरणार होत निघताना कॅप्टनन बऱ्याचशा औषधी गोळ्या माझ्या हवाली केल्या "इथ मलेरियाच प्रमाण फार मोठ आहे, तेव्हा या गोळ्या नियमितपणे घेत जा!" त्यान सागितल

मावळत्या सध्याकाळी 'कॅम्पबेल बे'च्या धक्क्यावर गर्दीपासून दूर मी एकटीच एका बाजूला उभी होते. नवे प्रवासी खाद्यावर घेऊन 'येरवा' परतीच्या वाटेनं निघाल होत दूर जाणार जहाज हळूहळू लहान होत गेल ओळखीचे सारे चेहरे अधुक होत गेले आणि या अनोळखी किनाऱ्यावर वाढत्या सध्याछायेसारखी एकाकीपणाची भावना मनावर झाकोळून आली

गावातल्या एकुलत्या एका हमरस्त्यान मी आमच्या गेस्ट हाऊसवर पोचले, तोवर अधार गडद झाला होता एका छोट्या टेकडीवर

बांधलेल्या या छोटयाशा बंगलीमधून खाली समुद्रकिनारी वसलेल्या गावातले दिवे लुकलुकताना दिसत होते.

ग्रेट निकोबार हे या भागातलं सर्वांत मोठं बेट ३३३ चौरस मैलाचा पसारा असलेलं या बेटाचं पूर्वीचं नाव Tokırong Long कॅम्प-बेल बे हे या बेटावरचं मुख्य शहर या शहराभोवती आता सरकारनं सेवानिवृत्त सैनिकांच्या वसाहती केल्या असल्यानं शहराचं महत्त्व वाढलं. त्यामुळं अर्थातच शाळा, दवाखाने, रस्ते, वीज, बस, इ. सुधारणा इथं झाल्या आहेत.

निकोबारमधल्या कुठल्याही बेटावर अस्तित्वात नसणारी एक गोष्ट ग्रेट निकोबारमध्ये आहे आणि ती म्हणजे नदी ! तहान लागली की विहीर खोदणे हा निकोबारी जीवनाचा एक भागच आश्चर्य म्हणजे समुद्रकिनाऱ्यापासून १५–२० फुटावर वाळू उकरली तरी स्वच्छ गोड पाणी सापडतं पण इथं ग्रेटनिकोबारमध्ये एवढेसुद्धा कष्ट घ्यावे लागत नाहीत. गलातीया, अलेक्झांड्रा आणि डगमार या त्रिवेणीच्या कृपेनं ग्रेट निकोबारमध्ये जंगलसंपत्ती व प्राणिजीवन या दोन्हींवर सुखवस्तू-पणाचं तेज झळकत असतं.

या जंगलात शॉम्पेन लोक राहतात स्वभावतः भित्रे-बुजरे असणारे हे लोक भटक्या प्रवृत्तीचे असतात त्यामुळे त्यांना शोधून काढायचं म्हणजे अक्षरशः जंगल पालथं घालायला हवं होतं.

इथले सहाय्यक आयुक्त श्री. महमद यांनी आदिवासी भागात बरंच काम केलं होतं, त्यामुळं अर्थातच त्यांना आमच्या या मोहिमेबद्दल प्रचंड उत्साह होता दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे ते जीप घेऊन आमच्या बंगल्यावर पोचले अन् आम्ही नेहमीप्रमाणे कॅमेरे खांद्यावर टाकून भटकंतीला निघालो

शहराच्या पूर्वेला उभ्या असलेल्या उंच पहाडावर एक वळणदार सडक साधारण वीस मैल गेल्यावर आमची जीप थांबली इथून पुढच्या जंगलात बॉर्डर रोडसच्या ' यांत्रिक ' वाल्यांनी (भारतीय सेना-दलातील जवानांचा एक विभाग) पूर्वी एक पक्का रस्ता आणि वाटेतल्या नदीवर एक पूलही बांधला होता, पण व्रात्य मुलांनी वाळूचा किल्ला

जमीनदोस्त करावा तशी इथ वारवार होणाऱ्या भूकपान या साऱ्या बाधकामाची अगदी दैना उडवली आहे. त्यामुळे आता पदयात्रा सुरू करण भाग होत

जागोजागी खचून ढासळलेला रस्ता मध्येच अजगरासारख्या आडव्या पडलेल्या रुद भेगा, केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर अजून उभे असलेले जराजीर्ण पूल या साऱ्यातून वाट काढत काढत मी आजूबाजूला पाहत होते

रस्त्याच्या डावीकडे उच उच चढत गेलेला पाषाणहृदयी पहाड, उजवीकडे खोलवर पसरलेली रहस्यमय दरी आणि या दोन्हींवर प्रचड हिरव्या छत्रीसारख सावली धरणार जगल

घनदाट जगल म्हणजे काय ते मला इथ प्रथम कळल शभर शभर फूट उचीची ही झाड त्याना वेढून वर चढणाऱ्या दाट वेलींमुळे बुरखाधारी डाकूसारखी दिसत होती फादी फादीवरून असख्य रगीबेरगी पक्षी लपडाव खेळत होते किती त्याचे रग, किती वेगवेगळी नक्षी त्याच्या पखावर आणि किती अनोखी रगसगती पुण्यातल्या लक्ष्मी रोडवरच्या साड्याच्या दुकानातसुद्धा अस रगसमृद्ध वैभव पहायला मिळणार नाही.

हे सार पाहता पाहता दहा-बारा मैल पायाखालून सरकले ते कळलच नाही वाटेत एका खोल दरीच्या कुशीत लपलेली एक आदिवासी झोपडी दिसली पण दुर्बिणीचे डोळे ताणूनही तिथ मनुष्यवस्तीच चिन्ह दिसेना, तेव्हा पुन्हा पदयात्रा सुरू झाली.

आणखी एक लटपटता पूल ओलाडल्यावर 'यान्त्रिक'च्या कामगाराची एक झोपडी दिसली इथल्या जगलात कावळे अजिबात नाहीत. पण त्याच्या भाईबदानी आमच्या पोटात मात्र चागलाच सूर धरला होता तेव्हा आम्ही झोपडीबाहेरच्या खाटेवर तळ ठोकला

जगलातच राहणाऱ्या या कामगाराना आदिवासींचा ठावठिकाणा माहीत असतो, म्हणून मी त्याना आसपास टेहळणी करायला पाठवल आणि आम्ही झोपडीच्या सावलीत विसावलो

थकल्या पावलाना कुरवाळीत आणि सुकल्या घशाला ओलावीत मी बसले होते तेवढ्यात वरच्या रस्त्यावरून हाका ऐकू आल्या. आम्ही

कॅमेरे वगैरे शस्त्रास्त्र परजीत त्या दिशेन धावलो

जगलात स्वच्छद हिंडणारे पाच-सहा आदिवासी तरुण नेमके आमच्या झोपडीजवळच येऊन पोचले होते मी पाहत होते. गव्हाळ रगाचे, उच, सडसडीत बाध्याचे, लांब केसाचे ते निसर्ग-पुत्र ! बारीक काळ्या डोळयाच्या नजरा भिरभिरत होत्या काटक शरीरांच्या हाल-चालीत सहज चपलता होती कमरेभोवतीची तुटपुजी लगोटी ही सस्कृतीची एकमेव साक्ष होती त्रिशूळाच्या आकाराचे धारदार भाले शिकारीचा वेध घ्यायला आसुसले होते.

जादूगारान पोतडी उघडावी तशा मी बरोबर आणलेल्या अनेक रगीबेरगी वस्तू त्यांच्यापुढे पेश केल्या लाल-हिरव्या-निळ्या-पिवळ्या मण्यांच्या माळा, चमकदार खड्याच्या अगठ्या, लाल कापडाच्या लगोट्या, साखर, तबाखू हा अलिबाबाचा खजिना पाहिल्यावर जग-लाच्या दिशेने पळणारी पावल अचानक थाबली.

या टोळीचा म्होरक्या इतरांपेक्षा जरा जास्त धीट अन् बेरकी होता त्यान पटकन् एक रगीत लुगी बळकावली अन् ती लगोटीसारखी कमरेभोवती बाधली मग पुढ-माग वळून स्वतःच रुपड न्याहाळताना त्यान अगदी फिल्मी हीरोचा आव आणला.

हिरव्या पानात गुडाळलेल एक पुडक त्यान केव्हाच साभाळून ठेवल होत त्याचा बरा मूड बघून मी त्या पुडक्याची चौकशी केली. माझ्या खाणाखुणाचा अर्थ ध्यानात येताच त्यान पटकन् ती पुडी सोडली अन् सापाच एक वेटोळ माझ्यापुढ उलगडल मी दचकून मागे सरकले तशी त्या साऱ्यानाच प्रचड हसू आल त्यांचा तो हीरोसुद्धा हातातल्या सापाला माझ्या दिशेन हेलकावे देत कितीतरी वेळ वाहत्या झऱ्यासारखा खळखळत राहिला

नतर का कुणास ठाऊक, पण अचानक त्याचा मूड बदलला त्यान आपल्या भाषेत भराभरा काहीतरी हुकूम सोडले अन् पहाटेच स्वप्न विराव तसे ते सारे निसर्गपुत्र क्षणार्धात जगलात विरून गेले जगला-तल्या ऊन-सावल्याची रागोळी जरासुद्धा विस्कटली नाही हिरव्या शातते-वर एक तरगसुद्धा उठला नाही. तुटणाऱ्या ताऱ्यासारखे ते सारे, मागे

कुठलीही खूण न ठेवता सहज दृष्टिआड झाले आता उरला होता फक्त आमच्याच हाकाचा प्रतिध्वनी– फक्त आम्हालाच ऐकू येणारा।

सध्याकाळी शहराच्या दिशेन पावल टाकताना ते अवखळ हास्य माझ्या मनात रेंगाळत होत

एक दिवस विश्राती घेऊन आम्ही पुन्हा मोहिमेवर निघालो या-वेळी निश्चय होता शाँपेन वस्ती शोधून काढण्याचा

'यात्रिक'चा एक कामगार हातातल्या कोयत्यान वाटेतल्या जाळ्या-वेली तोडत रस्ता काढत होता अन् आम्ही सारे अक्षरश धड-पडत त्याच्या मागे चालत होतो ओलसर चिकणमाती अन् वेलीच्या असख्य मुळ्या आम्हाला सतत पायचित करण्याचा प्रयत्न करत होत्या. भर दिवसा जगलावर पसरलेला कुबट अधार मनावर एक रहस्यमय दडपण आणत होता. बाजूच्या झुडपातून अचानक कानी येणारी सळसळ अगावर शहारे उठवत होती आणि एरवी उदरालासुद्धा घाबरणारी मी या जगलातली न दिसणारी वाट तुडवत निग्रहान पुढ चालले होते

वाटेत एक छोटीशी नदी आडवी आली. पाहुण्याच्या सोयीसाठी पूल बाधण्याच आतिथ्य या लोकाजवळ नसाव बहुधा त्यामुळे नदीवर आडव्या पडलेल्या नारळाच्या झाडावरून आम्ही कसेवसे पलीकडे पोचलो

जवळच कुठेतरी कुणी लाकूड तोडत असाव त्याचा ठकठक आवाज जगलातली शांतता कापत आमच्यापर्यंत येत होता आम्ही चोरपावलानी गुपचूप पुढे निघालो

एका जाळीतून डोकावून पाहिल समोर २–३ झोपड्या होत्या आणि १५–२० माणस होती त्यातल्या स्त्रिया कमरेभोवती कापड गुडाळून अर्धनग्नावस्थेत वावरत होत्या. एक जख्ख म्हातारा काठी टेकत खुरडत चालला होता चार-पाच तरुणानी वस्तीच्या चव्हाट्यावर कसलीशी कॉन्फरन्स भरवली होती

आमच्या अस्तित्वाची चाहूल लागली आणि हे चित्र क्षणार्धात पालटल सगळी बायका-मुल बावरलेल्या खारींसारखी जगलात पसार झाली आणि हाती भाले घेतलेले तीन-चार तरुण आमच्या 'स्वागता'ला

पुढ सरसावले बेगुमान रुबाबात मी शॉंपेन वस्तीत घुसले

माझ्या या आगाऊपणान ते निसर्गपुत्र चकित झाले असावेत पण मी सरळ तिथल्या एका झाडाखाली सिंहासनस्थ झाले पाठोपाठ आमच्या पक्षाचे इतर शिलेदारही दाखल झाले अन् हतबुद्ध झालेले ते आदिवासी तरुण "काय शिंची कटकट आहे !" असे चेहरे करून आमच्याकडे पाहत राहिले मग आपापसात त्यांनी काहीतरी चर्चा सुरू केली. या शहरी घुसखोराचा प्रश्न कोणत्या राष्ट्रसघापुढे माडावा याचा विचार-विनिमय ते करीत असावेत तोवर मी इकडे-तिकडे कॅमेऱ्याचे मोर्चे बाधायला सुरुवात केली होती.

पलीकडे एका झाडाखाली बसलेली दोन मुल स्थितप्रज्ञ योग्या-सारखी आजूबाजूच्या मानवाकडे दुर्लक्ष करून आपल्याच कामात गुग होती जवळ जाऊन पाहिल बरीचशी मधाची पोळी त्यांनी गोळा करून आणली होती आणि त्यातून मध काढण्याचा कुटिरोद्योग चालवला होता हे इथले सुशिक्षित बेकार असावेत असा विचार करत मी पाहत होते अधूनमधून पोळ्याचा एखादा तुकडा तोंडात टाकून मजेत चघळत त्यांच काम चालू होत मी जवळ गेले तसा त्यातल्या एकान एक तुकडा मलाही 'ऑफर' केला. त्या वेळी त्याच्या चेहऱ्यावर दाटून आलेल सात्त्विक औदार्य पाहून मी नाइलाजान तो मेणचट तुकडा तोंडात टाकला याप्रसगी मी केल्या अभिनयाला निदान फिल्मफेअर ॲवॉर्ड तरी मिळाय-लाच हवं असं माझ प्रामाणिक मत आहे.

'साप' हा शब्द ऐकला तशी माझी अभिनय समाधी भगली इकडे-तिकडे पाहिल तर समोरच्या झुडपांतून एक हिरवा जर्द साप सळसळत बाहेर निघत होता एका शॉंपेन तरुणाला खाणाखुणा करून मी तो साप मारायला सांगितल "हात्तिच्या ! त्यात काय मोठंस !" असा चेहरा करून त्यान भाला उचलला अन् डोळ्यावर येणारी झुलप सावरीत झुडपात नेम धरला कितीतरी वेळ तो असाच नेम धरून एका पायावर निश्चल उभा होता अन् मी श्वास रोखून पाहत होते अचानक त्याचा भाला झुडपात घुसला माझी ताणलेली उत्सुकता एव्हाना तुटायला आली होती त्यान भाला वर उचलला तेव्हा त्या तीक्ष्ण टोकावर तड-

फडत होता एक मोठ्ठा बेडूक !

साप आणि बेडूक याच्या कायापालटाच गणित सोडवायचा मी प्रयत्न करत होते तोवर त्यान चकमक काढून विस्तव पेटवला अन् मक्याच कणीस भाजाव तसा तो बेडूक खमग भाजून काढला आम्ही घाईघाईन कॅमेरा फोकस करतोय तेवढ्यात त्यान त्या बेडकाचा चट्टा-मट्टा करून टाकला होता

आमच्या बरोबर सहाय्यक आयुक्त महमद आले होते त्यानी एका झोपडीत शिरण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या भारान झोपडीचे बाबू मोडले. त्यानी स्वत ला सावरल खर पण सारे आदिवासी तरुण पोट धरधरून हसायला लागले अगदी लॉरेल हार्डीची फिल्म पाहून शाळकरी पोरानी हसाव ना तसच !

हे सार चालू असताना मी वस्तीत हिंडत होते

शॉपेनच्या झोपड्या जमिनीपासून १५-२० फूट उच बांबूवर उभारलेल्या होत्या त्याना झोपड्या म्हणणही धाडसाच ठरेल कारण चार-सहा झावळ्या एकत्र बाधून उभारलेल छप्पर आणि आहेत की नाहीत असा प्रश्न पडावा अशाच झावळ्याच्या भिती वर चढायला एक बाबूची ओबडधोबड शिडी शॉपेनच स्थापत्यशास्त्र एवढ्यावरच समाधानी होत

वस्तीच्या मध्यभागी पत्र्याच्या गजलेल्या पिपात पडासनची फळ शिजत होती त्याचा गोडसर वास वातावरणात भरून राहिला होता. एका झोपडीशेजारी बाबूच्या चौकटीवर अर्धवट खाल्लेली एक घोरपड वाळत टाकलेली होती कुठल्या तरी झोपडीत जुनाट कापडाचा बोळा किंवा पत्र्याच एखाद डबड अशी इस्टेट उघड्यावर पडली होती दोन-चार मरतुकडी कुत्री अगाच वेटोळ करून सुस्त पडली होती अन् या साऱ्या दृश्यावर चिलटांचा एक जाड थर तरगत होता

जागा बळकावल्यावर मूळ मालकान वैतागाव तसे आता ते शॉपेन तरुण आमच्यावर वैतागले होते त्यांच्या सहनशीलतेचा जास्त अत पाहणंही धोक्याच होतं त्यामुळे त्यांच्या बदललेल्या ' मूड 'चा अदाज घेऊन आम्ही त्या वस्तीतून काढता पाय घेतला

पुन्हा एकदा जगल तुडवत आम्ही परत फिरलो तोवर सध्याकाळ झाली होती 'यान्त्रिक' च्या झोपडीजवळ पोचेपर्यंत अधार पडला होता. अजून सात-आठ मैल रस्ता चालून जायच होत. बरोबरचे सहकारी झपाझप पावले टाकत पुढ निघून गेले होते. अन् मी मात्र थकलेले पाय ओढत ओढत त्याच्या मागे चालले होते माझ्या सोबतीला उरले होते महमदसाहेब आणि यान्त्रिकचा ओव्हरसिअर शशिबाबू

दिवसासुद्धा जिथे फारसा प्रकाश नसतो अशा जंगलात आता अक्षरश काजळी अधार भरून राहिला होता. पुढच पाऊल कुठ पडतय हेसुद्धा दिसत नव्हत.

थोड्या वेळान चद्र उगवला पण ती फिकट अशक्त चद्रकोर पाहून मी जास्तच वैतागले खचलेले रस्ते अन् तुटलेले पूल पार करताना असल्या निर्जीव चद्राचा काय उपयोग होणार ?

मनाची कवाड बद करून मी शशिबाबूच्या पावलावर पाऊल टाकत राह्यले मध्येच कधीतरी पायाजवळ सळसळ झाली मला आठवल महमद साहेबानी सांगितल होत, इथले बहुतेक सारे साप बिनविषारी असतात या आश्वासनाची ब्रह्मगाठ हाती धरून मी पुढं चालत राह्यले

अचानक अधारात एक प्रकाशकण चमकला— कुणी हळूच डोळे मिचकावेत तसा अन् मग पाहता पाहता झाडाझुडपातून हजारो प्रकाश-कण झगमगून उठले असख्य काजव्यानी केलेली ती चमचमती रोषणाई बघून पुण्यातल्या गणपतींची आराससुद्धा लाजली असती प्रकाशाच्या रांगोळीची क्षणोक्षणी बदलणारी नक्षी पाहत मी कितीतरी वेळ तिथं उभी होते— अधाराचे आभार मानीत !

पण माझी ही मुक्तावस्था दैवाला पसंत नसावी पुढच्या वळणा-वर दरीत खचलेल्या रस्त्यावरून पलीकडे जाण्यासाठी दोन लाकडी फळ्या टाकल्या होत्या त्या फळीवरून चाचपडत जाताना मला अचानक जाणवल की आपण पुढे टाकलेल्या या पावलाखाली फळीच नाही.

शशिबाबून झटकन् हात धरून मला पुढं ओढून घेतल अन् माझ्या अधांतरी पावलाला जमीन सापडली

महमदसाहेब म्हणाले, " मॅडम, तुम्ही थकला असाल. पाच मिनिटं या दगडावर बसा मग पुढं जाऊ ! "

पण चहूबाजूनी दाटणाऱ्या त्या अंधारात माझा श्वास घुटमळत होता बुडणाऱ्या माणसाच्या नाकातोंडात पाणी जावं तसा तो अंधार मला गुदमरून टाकत होता. त्यातून मला शक्यतो लौकर बाहेर पडायचं होतं, म्हणून मी वेड्यासारखी चालत राहिले, चालत राहिले !

नंतर केव्हा तरी एका वळणावर दूरवर जीपचे दिवे चमकले. त्या प्रकाशाचं फळफुट हाती घट्ट धरून मी अंधारात त्या महासागरात तरंगत राहिले काळ्या महासागराच्या किनाऱ्यावर आमची जीप उभी होती मी कशीबशी धडपडत तिथपर्यंत पोचले.

खरंच, कधीकधी जीपचे हेडलाईट पौर्णिमेच्या चंद्रापेक्षाही जास्त सुंदर दिसतात, नाही ?

शा. क्र

# वेड लावणारा अंदमानचा निसर्ग

तस पाहिल तर त्याची अन् माझी ओळख काही अगदी नवीन नव्हती पूर्वीही आमच्या गाठीभेटी झाल्या होत्या– काही मुबईत तर कधी गोव्यात ! पण आमची खरी मैत्री जमली ती अदमानच्या प्रवासात अदमान–निकोबार बेटावरच्या वास्तव्यात माझ्या साऱ्या सुदर–असुदर क्षणाचा तो साक्षीदार होता

ढळत्या सध्येचे इद्रधनुषी रग न्याहाळताना तो नेहमीच माझ्या शेजारी होता कधी एखाद्या उल्हसित क्षणी त्याच्या मुक्त हास्यान माझी साथ दिली होती, तर कधी एखाद्या निद्राहीन मध्यरात्री अस्वस्थ एकांतात घुमणाऱ्या त्याच्या नि श्वासानी माझी सोबत केली होती कधी माझ्या मनावर दाटलेली अनामिक उदासी त्यानं आपल्या मोरपिशी स्पर्शानि पुसून टाकली होती तर कधी एखाद्या सध्याकाळच्या सोनेरी क्षणी त्यान आपल्या गूढ व्यथेच सनातन सगीत मला ऐकवल होत.

असा हा माझा सर्वसाक्षी सखा म्हणजे समुद्र ! अथांग अनत असीम सागर !! त्याची असख्य मनोहर रूप मी मनात साठवून ठेवली आहेत–पुस्तकाच्या पानात पोरपिस जपून ठेवावीत ना, तशीच !

कलकत्याहून निघणाऱ्या 'हर्षवर्धन' बोटीवर मी चढले तेव्हा-पासून मला याच वेड लागल बोटीच्या डेकवर तासन् तास उभ राहून याची निखळ निळाई निरखण्याचा छदच जडला होता मला कधी वाटायच याच हे रूप पाहता पाहता आपचे डोळेसुद्धा निळे होऊन जातील का ? नंतर अदमान–निकोबारच्या बेटा–बेटावर हिंडताना मी

महमदसाहेब म्हणाले, " मॅडम, तुम्ही थकला असाल. पाच मिनिट या दगडावर बसा मग पुढ जाऊ ! "

पण चहूबाजूनी दाटणाऱ्या त्या अधारात माझा श्वास घुटमळत होता. बुडणाऱ्या माणसाच्या नाकातोंडात पाणी जाव तसा तो अधार मला गुदमरून टाकत होता. त्यातून मला शक्यतो लौकर बाहेर पडायचं होत, म्हणून मी वेड्यासारखी चालत राहिले, चालत राहिले !

नंतर केव्हा तरी एका वळणावर दूरवर जीपचे दिवे चमकले. त्या प्रकाशाच फळफुट हाती घट्ट धरून मी अधारात त्या महासागरात तरगत राहिले. काळ्या महासागराच्या किनाऱ्यावर आमची जीप उभी होती. मी कशीबशी धडपडत तिथपर्यंत पोचले

खरच, कधीकधी जीपचे हेडलाईट पौर्णिमेच्या चद्रापेक्षाही जास्त सुदर दिसतात, नाही ?

संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# वेड लावणारा अंदमानचा निसर्ग

तस पाह्यल तर त्याची अन् माझी ओळख काही अगदी नवीन नव्हती. पूर्वीही आमच्या गाठीभेटी झाल्या होत्या— काही मुबईत तर कधी गोव्यात ! पण आमची खरी मैत्री जमली ती अदमानच्या प्रवासात अदमान—निकोबार बेटावरच्या वास्तव्यात माझ्या साऱ्या सुदर—असुदर क्षणांचा तो साक्षीदार होता.

ढळत्या सध्येचे इद्रधनुषी रग न्याहाळताना तो नेहमीच माझ्या शेजारी होता कधी एखाद्या उल्हसित क्षणी त्याच्या मुक्त हास्यान माझी साथ दिली होती, तर कधी एखाद्या निद्राहीन मध्यरात्री अस्वस्थ एकांतात घुमणाऱ्या त्याच्या नि:श्वासानी माझी सोबत केली होती कधी माझ्या मनावर दाटलेली अनामिक उदासी त्यान आपल्या मोरपिशी स्पर्शानं पुसून टाकली होती तर कधी एखाद्या सध्याकाळच्या सोनेरी क्षणी त्यान आपल्या गूढ व्यथेच सनातन सगीत मला ऐकवल होत.

असा हा माझा सर्वसाक्षी सखा म्हणजे समुद्र ! अथाग अनत असीम सागर !! त्याची असख्य मनोहर रूप मी मनात साठवून ठेवली आहेत—पुस्तकाच्या पानात पोरपिस जपून ठेवावीत ना, तशीच !

कलकत्याहून निघणाऱ्या ‘हर्षवर्धन’ बोटीवर मी चढले तेव्हा-पासून मला याच वेड लागल बोटीच्या डेकवर तासन् तास उभ राहून याची निखळ निळाई निरखण्याचा छदच जडला होता मला कधी वाटायच याच हे रूप पाहता पाहता आपचे डोळेसुद्धा निळे होऊन जातील का ? नतर अदमान—निकोबारच्या बेटा—बेटावर हिडताना मी

याचे किती तरी रंग पाहिले कार-निकोबारभोवती गडद हिरव्या रंगाचा समुद्र—श्रावणातल्या कोवळ्या हिरवळीचा गालीचा अंथरावा तसा पोर्टब्लेअरचा समुद्र फिकट निळाई ल्यालेला-शंकराच्या नीलकंठासारखा, तर सिंक बेटाचा मोरपंखी समुद्र—रूपगर्वितेच्या रेशमी वस्त्रासारखा

कधी तरी या अवखळ समुद्राला एकाच रंगाचा कंटाळा यायचा. मग किनाऱ्याजवळ मोरपंखी दिसणारा समुद्र क्षितिजापाशी रंग पालटून गडद निळा व्हायचा तर कधी दुरून हिरव्या दिसणाऱ्या लाटा किनाऱ्यापाशी येतायेता फिकट जांभळी ओढणी पांघरून घ्यायच्या कधी कधी एकाच समुद्रात तीन तीन रंग सीमावाद विसरून आपल्या हद्दीत सुखानं नांदताना दिसायचे त्यातल्या प्रत्येक रंगाची हद्द अगदी फूटपट्टीनं आखून द्यावी तशी स्पष्ट असायची ही अनेकरंगी किमया प्रत्यक्ष पाहूनही अविश्वसनीय वाटते पण अर्थातच ही जादू असते ती समुद्र-तळातल्या बदलत्या खडकाची आणि कमी-अधिक खोलपणाची

पाण्यात पाय बुडवला तर आपला पाय आपल्यालासुद्धा दिसणार नाही असा मुंबईचा मळकट समुद्र पाहण्याची सवय होती मला त्यामुळे अंदमानच्या समुद्राचं स्फटिक शुभ्र रूप पाहून मी चकितच झाले इथं तर वीस फूट खोल पाण्यात पडलेल्या एका शिंपल्याचा रंगसुद्धा स्पष्ट दिसत होता जहाजाच्या डेकवरून मी उधळलेले पॉप कॉर्न खायला जमलेल्या माशांचे रंग रत्नजडीत अलंकारासारखे लखलखत होते इंद्रधनुषी रंगाच्या समुद्रवेली नाजूक हात हलवून खुणावत होत्या पाहता पाहता मनात यायचं की बुडून मरण जर नशिबी असेल तर या समुद्रात बुडतानासुद्धा मला मुळीच वाईट वाटायचं नाही अंदमानच्या प्रवासात हा समुद्र माझा सहप्रवासी होता पण याचा स्वभाव फारच लहरी ! कधी तो हळूच माझ्या खिडकीत डोकावून मला साद घालायचा कधी झाडाच्या गर्दीत लपून डोळे मिचकायचा कधी हट्टी मुलासारखा रुसून किनाऱ्यापासून लांब जाऊन बसायचा याच्या लाटांचीसुद्धा किती विविध रूपं !

मखमली गालीचा उलगडावा तशी एखादी लाट किनाऱ्यावर उलगडायची उन्मत्त जंगली घोड्यासारखी एखादी लाट थैमान करा-

यची कधी एखादी प्रेमवेडी लाट बाहू पसरून किनाऱ्याकडे धावत यायची पण ती जेवढी पुढं येईल तेवढाच तो निर्मोही किनारा तिला झिडकारून मागं सरकायचा मग ती पराभूत लाट खडकावर आदळून फुटून जायची

हा किनारा सुद्धा ठिकठिकाणी वेष बदलायचा पांढऱ्या वाळूनं सजलेलं अर्धवर्तुळाकार ककाना बीच अष्टमीच्या रूपेरी चंद्रकोरीसारखं दिसतं हट बेच्या पिकनिक स्पॉटवरचा लालसर वाळूचा किनारा भांगात भरवेल्या कुंकवासारखा वाटतो महाकाय हत्तींचा कळप यक्षाच्या शापानं पाषाणरूप होऊन पडावा अशा प्रचंड खडकांनी पिग्मॅलीयनचा किनारा वेढलेला असतो

अन् या साऱ्या किनाऱ्यांच्या पलीकडे उभं असतं सदाहरित जंगल.

कार-निकोबारच्या किनाऱ्याला नारळाच्या झावळ्याची झालर असते कार-निकोबार म्हणजे नारळाचं माहेरघर इथं हजारो नारळाची झाडं माहेरवाशिणीच्या मुक्तपणानं वाऱ्यावर डुलत असतात

या नारळीची झाडं मुंबईच्या ओनरशिप फ्लॅटमध्ये राहणाऱ्या सुखवस्तू गृहिणीसारखी वाटतात—स्वतःच्या तोऱ्यात गर्क असणाऱ्या शेजाऱ्याशी मुळीच संबंध न ठेवणाऱ्या ! या उलट ग्रेट निकोबारच्या किंवा लिटल अंदमानच्या जंगलातली झाडं कशी एकमेकाच्या खांद्या-वर हात टाकून उभी असतात.

शंभर-सव्वाशे फूट वाढणाऱ्या या झाडांचं लाकूड उत्तम प्रतीचं असतं बांधकाम आणि फर्निचर या दोन्हीसाठी या लाकडाला मोठी मागणी असते त्यामुळे अर्थातच इथं जंगलतोड जोरात चालू झाली आहे या कामात मोठा सहभाग असतो हत्तींचा केरळहून आणलेले अनेक 'सुशिक्षित हत्ती या कामात गुंतलेले आहेत हे कामगार महा-गाई भत्ता वाढवून मागत नाहीत, की संप करत नाहीत त्यामुळे सध्या तरी या जंगलात शांतता नांदते आहे पण भांडवलदारी जुलमाला कंटाळलेले हे सारे हत्ती गजराज अप्पूच्या अध्यक्षतेखाली एक युनियन काढणार आहेत, अशी बातमी नुकतीच कानावर आली आहे

एवढ्या घनदाट जंगलात खूप वन्य प्राणी पाहायला मिळतील

अस वाटल होत पण या बाबतीत मात्र निराशाच पदरी पडली इथ वर्षातून ७-८ महिने पाऊस पडत असला तरी बहुतेक बेटावर पिण्याच्या पाण्याचा नैसर्गिक साठा नसतो त्यामुळे इथल प्राणिजीवन मर्यादित आहे

रॉस बेटावर हरणाची पैदास केली आहे ग्रेट निकोबारच्या घनदाट जगलात असख्य माकड आढळनात विशेष म्हणजे ही माकड मांसाहारी आहेत मासे, खेकडे यांची मेजवानी त्याना फार आवडते याच जगलात चित्रविचित्र रगीबेरगी पक्षीसुद्धा खूप आहेत पण कावळा मात्र औषधालासुद्धा नाही खाद्यावर दुर्बीण आणि कॅमेरा लटकवून स्वच्छद फिरायला ग्रेट निकोबारच जगल हे उत्तम ठिकाण !

ग्रेट निकोबारच्या नदीनाल्यात माशापेक्षा मगरीच जास्त असतात त्यामुळे माशांची शिकार करायला गेलेले कोळी पुष्कळदा स्वत च मगरींची शिकार होतात

वाढत्या लोकसख्येमुळे साप आणि अजगर मात्र आता 'अल्पसख्याक' झाले आहेत इथल्या जगलात वेगवेगळ्या प्रकारचे अन् आकाराचे सरडे दिसतात त्रिलॉगचाँग बेटावर सहा फूट लांबीचे हिरवे सरडे असतात पूर्वी तानाजीच्या गोष्टीत वाचलेली पण कधीच न पाहिलेली घोरपड मी इथ पाहिली 'ब्ल्यू क्रॅब' जातीचा इथला खेकडा सबध नारळ फोडून आतल खोबर मटकावून टाकण्यात पटाईत असतो मेगॅपोड नावाचा साधारणत बगळ्यासारखा दिसणारा एक पक्षी फक्त याच भागात सापडतो त्यामुळे इथल्या प्राणी–पक्षी सशोधनात त्याला मानाच स्थान असत हा पक्षी वाळूचे मोठे ढिगारे रचून त्यात अडी उबवत ठेवतो आधुनिक इनक्युबेटरची ही प्राथमिक आवृत्ती !

अदमान-निकोबारचा समुद्र म्हणजे जलचराच समृद्ध साम्राज्य

सार्डीन, ट्यूना, बाराकुडा, मॅकरेल, स्टार फिश मत्स्य समाजातल्या साऱ्या जाती–पोटजाती इथ उपस्थित आहेत– आपल्याला माहीत असलेल्या अन् नसलेल्याही !

या मत्स्यसाम्राज्याचे अधिपती शार्क महाराजही प्रजाननाना अधूनमधून दर्शन देत असतात जॉली बॉय बेटाला भेट देऊन आमची

मोटर लाँच परतीच्या वाटेवर होती अचानक कुणाच तरी लक्ष गेल बऱ्याच दूर अतरावर शेपटीचा त्रिकोणी झेंडा लाटावर फडफडत होता. तो शार्कच आहे अस खलाशाच म्हणण होत या विधानाची सत्यता पडताळून पाहण्याची फारशी उत्सुकता कुणी दाखवली नाही, पण इतका वेळ हिरीरीने चालू असलेल्या गाण्याच्या भेंड्या मात्र एकदम बद पडल्या

सिंक बेटाच्या वाटेवर एकदा आम्हाला डॉल्फीन मासे भेटले. निमुळत्या लवचिक शरीराचे अन् खेळकर स्वभावाचे हे गब्दुल मासे पाण्यातून उच उच उड्या मारत होते शेपट्या हलवीत उड्या मारत ते किती वेळ आमच्या लॉचच्या मागोमाग येत राहिले सहलीला निघालेल्या शाळकरी मुलानी दगामस्ती करावी, मास्तराच्या पाठोपाठ चालाव तस !

मोठमोठी कासव, अष्टपाद (Octopus), अनेक प्रकारचे लहान-मोठे खेकडेसुद्धा बरेच सापडतात फ्लाईंग फिशचे थवे खेळण्यातल्या हेलिकॉप्टरसारखे पाण्यावरून उडताना दिसतात

नारळ हा इथला कल्पवृक्ष पण त्याव्यतिरिक्तही अनेक प्रकारच उत्पन्न इथल्या जगलात मिळत त्यात प्रमुख म्हणजे केळी ठेंगणी, ठुसका वेलची केळी अन् गलेलठ्ठ लाल केळी इथ खायला मिळतात पपई,पेरू, अननस, सीताफळ अशा रानमेव्याचीही इथ रेलचेल असते काजू,लवगा, दालचिनी अशा बड्या प्रस्थाच अस्तित्वही इथ आढळत सुपारी, कद-मूळ सहज सापडतात कार-निकोबार, ग्रेट निकोबार बेटावर हल्ली भाजीपाल्याची लागवड केली आहे तर कचाल बेटावर रबराच्या झाडाची लागवड केली आहे

ही सारी लहान-मोठी बेट म्हणजे सागर सपत्तीचे खजिनेच निस-र्गाच्या कुशल कुचल्यान विविध रगात रगवलेले शख-शिपले मानवी मनाला स्तिमित करतात यांतली प्रत्येक वस्तू आपापल्या खास वैशि-ष्ट्यान नटलेली असते शख, शिपले, कवड्याचे लहान-मोठे आकार, त्यावरच्या विविध रगछटा आणि नाजूक नक्षी पाहता पाहता दृष्टी चकित होते

अंदमानचा साराच निसर्ग असा वेड लावणारा आहे. ' हट बे ' चा धबधबा पाहतानाही मी अशीच स्तिमित झाले होते. दाट जंगलाच्या कुशीत लपलेल्या या धबधब्याचा गंभीर नाद दूरवरूनच कानात घुमायला लागतो संगीत मैफलीतल्या श्रोत्यासारखे आजूबाजूचे सारे वृक्ष त्या नादब्रह्मात हरवून मान डोलावीत असतात. जंगलातली अस्पष्ट पाऊलवाट गवयाच्या तानेसारखी वळण घेत जात असते पुढच्या वळणावर मी अचानक थबकते. समोरच्या उंच खडकावरून तो धुंद प्रपात कोसळत असतो तुषारांचे मोती उधळत असतो. खाली असलेलं छोटंस सरोवर या उन्मत्त प्रपाताला पोटाशी धरत त्या सरोवरातून निघालेली एक बाधेसूद सरिता ठुमकत ठुमकत जंगलातून दूर जात असते

खरं सांगायचं तर हा प्रपात फार प्रचंड नाही, फारसा भव्य, दिव्यसुद्धा नाही, पण या ठिकाणाला निसर्गदत्त शांतीचं वरदान आहे. सृष्टीकर्त्यानं स्वतःच्या विश्रांतीसाठी हा वनविहार निर्माण केलाय की काय असंच वाटतं ही शांती म्हणजे इथल्या निसर्गाचा अविभाज्य भाग आहे अन् त्याचं सर्वांत मोठं आकर्षणही तेच आहे.

एकदा आम्ही सिंक बेटांना भेट द्यायला गेलो उत्तर सिंक आणि दक्षिण सिंक ही आवळी-जावळी बेटं वाळूच्या किनाऱ्यानं एकमेकांना जोडलेली आहेत, शंख-शिंपले वेचता वेचता इतरांना मागे सोडून मी एकटीच आपल्या नादात किती तरी दूर निघून आले. कुठलाही मानवी स्वर आता कानी पडत नव्हता रुपेरी वाळूच्या विस्तीर्ण किनाऱ्यावर कधीच कुठल्या पावलाच्या खुणा उमटलेल्या दिसत नव्हत्या दूर अंधुक दिसणाऱ्या बेटावरही मानवी अस्तित्वाची एकही निशाणी नव्हती अथांग मोरपंखी समुद्र स्थितप्रज्ञ योग्यासारखा समाधी लावून बसला होता. नाजूक लाटांचे अस्पष्ट श्वास किनाऱ्यावर पसरत होते आणि साऱ्या आसमंतात भरून उरली होती, एक अनादि-अनंत शांती !

या अस्पर्शित निसर्गदृश्याकडे पाहता पाहता मला वाटलं, जेव्हा मानव जन्माला आलाच नव्हता तेव्हाची सृष्टी अशीच दिसली असेल युगायुगांपूर्वी साऱ्या जगातला निसर्ग असाच अस्पर्शित, असाच निष्कलंक दिसला असेल अनंत काळापूर्वीच्या तरुण पृथ्वीवर अशीच अपार सुंदर

शाती नांदली असेल नाही ?

ढळत्या सध्याकाळी आम्ही बेटे सोडून परत फिरलो. मोटर-लाँच-मध्ये उभी राहून मी पाहत होते आमच्या अस्तित्वाच्या खुणा त्या किनाऱ्यावर उमटल्या होत्या पावलाच्या असख्य खुणांनी किनाऱ्याची रेशमी वाळू विस्कटली होती प्लॅस्टिकचे रगीत चमचे, कागदी डिशेस, सिगरेटची रिकामी पाकिटे, एखादा फुटका ग्लास, फाटकी वर्तमान-पत्र आधुनिक सस्कृतीचे अनेक अवशेष आम्ही माग ठेवले होते

वाटल, काही दिवस हे सारे अवशेष या किनाऱ्याचा कब्जा घेतील अन् मग कधीतरी हळूहळू नष्ट होतील त्याची आठवणसुद्धा या किनाऱ्याला राहणार नाही अशीच कधीतरी मानवी सस्कृतीची सारी चिन्ह पुसली जातील मग उरेल तो केवळ कुवार किनारा अन् त्यावर नादणारी अपार शाती या साऱ्याला साक्ष असेल अनिर्बंध सागराची आणि नि:शब्द आकाशाची ! !

अचानक मला रवींद्रनाथाच्या ओळी आठवतात...

What is your language, Ocean,
The language of eternal
question
What is your answer, Sky,
The language of eternal silence

# एका होडीतून, छोट्या नाल्यातून

हिरव्या कॅनव्हासवर अनवधानाने गढूळ पाण्याचा ओघ पडावा, तसा जंगलातून वाहत येणारा एक गढूळ नाला, त्या नाल्याच्या अरुंद पात्रातून हळूहळू पुढे सरकणारी एक छोटी होडी, अन् त्या होडीत दाटावाटीने बसलेले आम्ही! आम्ही म्हणजे माझे दोन सहकारी, साहाय्यक आयुक्त महमदसाहेब, दोन नावाडी अन् मी!

त्या दिवशीही आम्ही भल्या पहाटे कॅमेरा खांद्यावर टाकून निघालो होतो. कॅम्पबेल बे च्या धक्क्यावर एक मोटर लाँच आमची वाट बघत होती. त्या लाँचमधून साधारण दीड-दोन तासाचा समुद्रप्रवास केल्यावर आम्ही या नाल्याच्या मुखाशी येऊन पोचलो. लाँचच्या मागे बांधून आणलेली छोटी होडी सोडली अन् तीत बसून आम्ही प्रवाहाच्या उलट दिशेने हळूहळू जंगलात शिरलो.

या नाल्याचे नाव झो नाला. याच्या काठावरच्या दाट जंगलात काही आदिवासी झोपड्या दिसतात अशी प्रादेशिक बातमी ऐकली अन् आम्ही लगेच या मोहिमेवर कूच केले.

आता या होडीत बसून आजूबाजूच्या जंगलाकडे पाहताना मला ब्रिज ऑन द रीव्हर क्वाय मध्ये पाहिलेल्या जंगलदृश्याची आठवण येत होती. काठावरची झाडे भालदार-चोपदारासारखी कमरेत वाकून आम्हाला सलामी देत होती. एकमेकात मिसळलेल्या त्यांच्या फांद्यामुळे तिथे एक हिरव्या रंगाचा लांबलचक बोगदाच तयार झाला होता. खाली झुकलेल्या फांद्या जाता जाता कुणाच्याही डोक्यावर टपला मारीत होत्या. पाण्यात वाढलेल्या असंख्य वनस्पती होडीच्या पायात घुटमळत होत्या.

या साऱ्या हिरव्या गर्दीतून वाट काढत पाण्यावर उतरलेला उन्हाचा एखादा कवडसा, जत्रेत चुकलेल्या मुलासारखा रडवेला वाटत होता

मध्येच एक ठिकाणी थाबून आमच्या नावाड्यान कानोसा घेतला जवळच्याच एका झाडावर चढून टेहळणी केली, अन् मग मान हलवून खांदे उडवून पुन्हा वल्ही मारायला सुरवात केली

नाल्याच पात्र आता जास्तच अरुद व्हायला लागल होत पाण्याचा गढूळ रग आता हिरवट दिसायला लागला होता वाटेत येणाऱ्या फाद्या आणि मुळ्या चुकवीत आमची लहानशी होडी हळूहळू पुढ सरकत होती आम्ही सारे भिरभिरत्या नजरेन अन् जागत्या कानान कानोसा घेत होतो

अचानक समोरच्या वळणावर चिखलात अस्वस्थ हालचाल उमटली अन् क्षणार्धात एका मोठ्या मगरीन किनाऱ्यावरून पाण्यात झेप घेतली आमच्या नजरा स्थिरावतात तोवर धप्पकन आवाज होऊन पाणी उसळल अन् ७–८ फूट लाबीची चिखलान बरबटलेली ती मगर गढूळ पाण्यात नाहीशी झाली

त्या वेळी आमची होडी त्या वळणापासून अगदी आठ-दहा फुटांवरच होती

हे सारच इतक अवचित घडल की मी चकित होऊन पाहतच राहिले क्षणभर तर मी भीतीची भावनासुद्धा विसरले पण मग वाटल की, ही वैतागलेली महामाया पाण्याखाली काय प्रताप करील कुणास ठाऊक ? शिवाय हा तिचा नेमका ' लच-टाईम ' असला तर ?

हा विचार माझ्याप्रमाणेच सर्वांच्याच मनात आला असावा, कारण इतका वेळ उत्सुकतेन जगल न्याहाळणाऱ्या साऱ्या नजरा आता पाण्यावर खिळून राहल्या होत्या इतका वेळ मजेत पाण्यात पाय सोडून बसलेला माझा एक सहकारी आता गुडघे पोटाशी घेऊन गुपचुप बसला होता

नाव पुढ जात राहिली नाल्याच पात्र आणखी अरुद झाल काठावरच जगल आता आक्रमक शत्रूसैन्यासारख पुढपुढ यायला लागल.

आता त्या नाल्याला प्रचड डबक्याच स्वरूप आल होत भोवतीच्या

चिखलात, झाडावर चित्रविचित्र किडे दिसत होते साठलेल्या पाण्याचा विचित्र वास जास्त जास्त उग्र होत चालला होता

अखेर एका ठिकाणी नाव थांबली माहीतगार नावाड्यांनी आजू-बाजूच्या खाणाखुणा निरखल्या अन् होडी किनाऱ्याला लावली साऱ्यांनी आसपासच्या जंगलात शोध घेतला

तिथं होत्या दोन-तीन झोपड्या इथल्या निसर्गाला कधीकाळी मानवाचं दर्शन झालं होतं याचा तेवढाच पुरावा तिथं बाकी होता त्या रिकाम्या, उद्ध्वस्त, जीर्ण झोपड्या आपल्या हरवलेल्या घरमालकाची वाट बघत आणखी किती काळ तिथं उभ्या राहणार होत्या कुणास ठाऊक ! त्यांच्या प्रतीक्षेमध्ये अडथळा न आणता आम्ही परत फिरलो

परतीच्या वाटेनं होडी वल्हवणारा नावाड्याचा हात अचानक थांबला त्यानं हळूच आम्हाला खूण केली पाण्यावर तरंगणाऱ्या एका फांदीवर मगरीचं एक पिल्लू वामकुक्षी करत होतं. जेमतेम फूटभर लांबीचं ते गोजिरवाणं पिल्लू पाहून महमदसाहेबांना मोह पडला ते म्हणाले, " बाई, आपण हे पिल्लू घरी घेऊन जाऊ या का ?" माझी तशी काहीच हरकत नव्हती, पण या 'किडनॅप' प्लॅनला त्या पिलाच्या आईची जोरदार हरकत असणार हे मला जाणवत होतं ते पिल्लू आमच्या घरीं पोचण्याऐवजी आम्हीच त्याच्या घरी पोचण्याची शक्यता जास्त होती त्यामुळे आम्ही त्या बाल मगरीला टाटा करून पुढं निघालो. पुढे एका ठिकाणी काही काळे बगळेही दिसले

प्रवाहाबरोबर वाहणारी आमची होडी आता वेगानं समुद्राकडे निघाली होती श्वासात कोंदलेला पाण्याचा विचित्र वास हळूहळू कमी होत होता नाल्याच्या पाण्यानं पुन्हा रंग बदलला अन् आम्ही समुद्रकाठी पोचलो. दूर समुद्रात नांगरून ठेवलेली मोटरलाँच गोठ्यात बांधलेल्या वासरासारखी दिसत होती

परतीच्या प्रवासात मात्र सारेच जरा थंडावले होते इतका धोका पत्करूनही मोहीम फत्ते झाली नाही हे साऱ्यांच्या मनात सलत होतं मी आणि महमदसाहेब पुढच्या मोहिमेची आखणी करत होतो

एक दिवस विश्रांती घेऊन आम्ही पुन्हा एकदा भ्रमंतीला बाहेर

पडलो.

कॅपबेल बे च्या दक्षिणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर सेवानिवृत्त सैनिकाच्या वसाहती आहेत त्यांची छोटी छोटी घर आणि शेत माग टाकली की जगल सुरू होत तिथून बरच पुढ गेल्यावर गलातिया नदी वाटेत आडवी येते पलीकडे एक आदिवासी वस्ती आहे

बॉर्डर रोड्स्च्या 'यात्रिक' वाल्यानी या नदीवर नुकताच पूल बाधला आहे तिथच 'यात्रिक' च्या जवानाची एक छावणीसुद्धा आहे तिथले मुख्य अधिकारी कॅप्टन कार आमची वाटच पाहत होते शिवाय 'फिल्लम' वाले येणार म्हणून त्यानी आजुबाजूच्या आदिवासींनाही 'होशियार' करून ठेवल होत.

इथले हे आदिवासीसुद्धा शॉपेन जमातीतलेच पण याची भाषा वेगळी शिवाय शहरी लोकाशी सपर्क आल्यान जरा सुधारलेले म्हणजे लगोटीऐवजी हाफ पॅट घालणारे

मला वाटत, याच्या भाषेत 'आघोळ' हा शब्दच अस्तित्वात नसावा साऱ्याच्या अस्तित्वाभोवती उग्र वास फेर धरून होता. समुद्रकाठच्या वस्तीत तर इतका दुर्गंध येत होता की, मुबईची झोपडपट्टी परवडली

सतरा-अठरा वर्षांचा एक शॉपेन तरुण हातात भाला घेऊन गप्प उभा होता हे लोक भाल्यान मासेमारी करतात, अस मी ऐकल होत मी खाणाखुणा करून त्याच्याकडे चौकशी केली त्याबरोबर तो भाला पेलून समुद्राच्या दिशेन चालायला लागला. अन् आम्ही कॅमेरा उचलून त्याच्यामागोमाग ! मग त्यान आम्हाला प्रात्यक्षिक करून दाखवल

त्याच्याबरोबर असणाऱ्या तरुणीचे काही शॉट घेतले चार वर्षांचा एक लहान मुलगाही त्या घोळक्यात होता त्यान मात्र आमचा कॅमेरा बघताच भोकाड पसरल

या आदिवासीपैकी एकाला यात्रिकवाल्यानी नोकरी दिली आहे कामगार म्हणून त्याला आता दर महिन्याला पगार मिळतो महमदसाहेबानी त्याला बँकेत पैसे ठेवायलाही शिकवलय

पण या लोकाना अजून पैसा या शब्दातली जादू उमजलेली नाही.

मूठभर तंबाखूच्या बदल्यात दहा रुपयांची नोट ते अगदी सहज काढून देतात अर्थातच इतर लोक या भोळेपणाचा तत्परतेन फायदा घेतात एका लंगोटीच्या बदल्यात बाटलीभर मद्य किंवा पाच-दहा विड्याच्या बदली टोपलीभर लिंब असे इथले सौदे पाहून कुठल्याही अर्थशास्त्रावर अनर्थ ओढवेल

दुपारपर्यंत आमच तिथल काम संपल. गलातिया नदीच्या काठी मी परत आले तर आर्मीचा एक टनी ट्रक तिथ उभा होता मला सर्व प्रकारच्या वाहनाची सवय झाली होती त्यामुळे त्या एक टनाच्या खिळ-खिळचा सागाड्याकडे पाहून मी जरासुद्धा डगमगले नाही

"आता कुठे ?" हा प्रश्न ओठावर यायच्या आत त्या गणवेष-धारी चक्रधराने ते धूड वळवून समुद्रकिनारी म्हणजे चक्क पाण्यातच घुसवल

शाळा सुटल्याची घंटा वाजताच पोरानी बाहेर धाव घ्यावी तशा भरतीच्या लाटा सैरावैरा धावत होत्या उसळणार पाणी ट्रकच्या गुडघ्यापर्यंत पोचत होत पाण्यात निम्मीअधिक बुडलेली चाक पुढे जाताना पाण्याच कारंज उडवीत होती चाकावर आदळणाऱ्या लाटांचे तुषार खिडकीतून आत शिरून मला भिजवत होते अन् धावत्या लाटाशी शिवाशिवी खेळत आमचा ट्रक पुढ चालला होता.

पधरा-वीस मिनिट असा जलमार्गानं प्रवास केल्यावर किनारा संपला अन् आम्ही खुश्कीच्या मार्गान जगलातून पुढ निघालो दाट जगलातल्या पायवाटेसारख्याच अरुंद रस्त्यान ट्रक जात होता आजू-बाजूची झाड जाता जाता ट्रकशी हस्तांदोलन करीत होती जगलातून रस्ता तयार करणाऱ्या 'यांत्रिक'च्या लोकानी लावलेल्या सुरुगाचे आवाज अधून मधून धडाडत होते

थोड्या वेळान जगल माग टाकून आम्ही पुन्हा समुद्रकिनाऱ्यावर आलो मात्र या किनाऱ्याच रूप अगदी वेगळ होत इथ नजर पोचेल तिथपर्यंत प्रचड काळे पाषाण अस्ताव्यस्त पसरले होते नेहमी पाहिलेल्या खडकाळ समुद्रकिनाऱ्यापेक्षा हा अगदी वेगळा होता कारण मुळात हा किनारा खडकाचा दिसत नव्हताच मुळी रेतीच्या किनाऱ्यावर कुणी तरी

हे पाषाण आणून टाकावेत तसंच दिसत होतं काळ्या राक्षसांनी पाढऱ्या गालिचावर अंग टाकून ताणून द्यावी तसं हे दृश्य होतं.

पाहता पाहता वाटत होतं, चिडलेल्या सॅमसननं आपल्या प्रचंड बाहुबलानं राजवाडा उद्ध्वस्त केला त्यानंतरच दृश्य असंच दिसलं असेल बहुधा.

आमच्या बहाद्दूर चक्रधरानं बघता बघता ट्रक खडकावर चढवला. घू घू आवाज काढत इंजिनानं तक्रार केली जागच्या जागी फिरणारी चाकं हटून बसली पण त्यानं मुळीसुद्धा दाद दिली नाही हट्टी पोराला दामटावं तसं त्यानं ट्रकला दामटून पुढं चालवलं होतं लहान-मोठ्या खडकावरून जाणारा ट्रक कधी या बाजूला तर कधी त्या बाजूला जात होता नवशिक्या नर्तकानं ताल अन् तोल सोडून पदन्यास करावा तसा आमचा ट्रक मनमौजी नृत्य करत होता रस्ता संपेपर्यंत आपली किती हाडं हरवलेली असतील याची चिंता करत मी जीव मुठीत धरून बसले होते

अखेर शेवटचा खडक मागे पडला अन् जंगलाच्या काठाशी आमचा ट्रक थांबला मी खाली उतरले आपले हात-पाय जागच्या जागी शाबूत आहेत याची खातरजमा मी करून घेत होते. तोवर कॅप्टन कार ट्रकमधून उतरून माझ्याजवळ आले म्हणाले, " मॅडम, तो पहा, समोर दिसतोय ना तो पिग्मॅलियन पॉइंट "

कन्याकुमारी हे हिंदुस्थानचं सर्वांत दक्षिण टोक असं आपण समजतो तो आपला गैरसमज ! भौगोलिक सत्य असं आहे की हिंदुस्थानचं दक्षिण टोक म्हणजे हा पिग्मॅलियन पॉइंट. इथं एक उंच दीपगृह आहे त्याच्या पायथ्याशी सेनेची छावणी आहे. निरभ्र रात्री या दीपगृहावरून जावा-सुमात्रा बेटावरच्या दिव्याचा प्रकाश दिसतो म्हणे या भागातून जाणारी सारी मोठी जहाजे या टोकाला वळसा घालूनच पुढं जातात

त्या दीपगृहाचे अन् आजूबाजूच्या दृश्याचे काही शॉट्स् घेतले अन् मग मी साऱ्यांना तिथंच सोडून समुद्रकिनारी आले सूर्यकिरणाच्या परिस-स्पर्शानं सारा समुद्रच सोन्याचा झाला होता. त्या समुद्राकडे त्या किनाऱ्याकडे पाहताना अचानक जाणवलं की मी या क्षणी भारतमातेच्या

चरणाजवळ उभी आहे समुद्राकडे पाठ फिरवून किनाऱ्याकडे पाहत आपल्या विशाल मातृभूमीची कल्पना करू पाहणार माझं मन उगाचच भारावून गेलं मग मी खाली वाकून त्या मऊशार रेतीवरून हळूच हात फिरवला

" मॅडम, तुमचा चहा थंड होतोय हं ! " कॅप्टनच्या हाकेनं मला पुन्हा माणसांत ओढून आणलं.

चहा आणि गप्पा संपवून आम्ही परत फिरलो तोवर सूर्यास्त होऊन गेला होता खडकांवरून उड्या मारत, जंगलातून वाट काढत अन् पाण्यातून पोहत आमचा ट्रक गलातियाच्या छावणीवर पोचला तोवर अंधार दाटला होता आम्ही जीपमध्ये सामान चढवतो तोवर ट्रकनं पुन्हा मोहरा वळवला होता आम्हाला पोचवायला आलेले कॅप्टन कार आता पुन्हा आपल्या छावणीवर परत जाणार होते. रात्रीच्या वेळी असा विचित्र प्रवास करायचा या कल्पनेनंच मी हादरले. आत्ता या छावणीत राहून सकाळी तिकडे गेलं तर काय हरकत आहे ? यावर उत्तर आलं की, कमांडिंग ऑफिसरनं आपल्या ठाण्यावर पोचायलाच पाहिजे.

अन् मग सगळ्याशी शेकहँड आणि मला एक कडक सॅल्यूट ठोकून तो कॅप्टन वाढत्या अंधारातून परतीच्या वाटेवरून निघून गेला.

# जादूटोण्यानं भारलेलं बेट

गोल गवती झोपडीच्या आत अंधुक प्रकाश झिरपत होता आतल्या अर्धवट अंधाराला रहस्यमयतेच अस्तर होत झोपडीच्या मधल्या खांबाला टेकून मी उभी होते. भोवताली उभे असलेले ते सगळे निश्चल नजरेन मला न्याहाळत होते. कुणाच्या हाती तेलाची बाटली, कुणाच्या ओठात विझलेला चिरूट तर कुणाच्या डोक्यावर गवती टोपी ! किती तरी चित्रविचित्र व्यक्ती व वल्ली, पण साऱ्याचेच निर्विकार, भावहीन चेहरे ! साऱ्याचेच शून्य डोळे ! अगदी हिचकॉकला हळहळ वाटावी अशी नाट्यपूर्ण परिस्थिती !

म्हणजे त्याच काय झाल, की चौरा बेटावरचे लोक जादूटोण्यात गुरफटलेले असतात हे मी ऐकल होत पण आम्ही चौरावर पोचलो तेव्हा तिथला स्थानिक हुडिनी तिथून अतर्धान पावला होता तो कचाल बेटावर असणार अशी खास गोटातली बातमी होती अन् म्हणूनच त्याला शोधत मी इथ येऊन पोचले होते

गावाबाहेर बऱ्याच दूर असलेल्या एका मोठ्या गोल झोपडीत आम्हाला ही जादूची शाळा सापडली त्याच झोपडीत उभी राहून मी पाहत होते आजूबाजूला उभे असलेले चित्रविचित्र लाकडी पुतळे ! जादूटोण्यासाठी या पुतळ्याचा वापर करतात आज फॅन्सी ड्रेसची स्पर्धा ठेवली असावी असच वाटत होत एक मळकट लुंगी नेसलेला तर दुसरा रेशमी वस्त्र परिधान केलेला कुणी आक्रमक पावित्र्यात उभा असलेला, कुणी खुर्चीवर विसावलेला तर कुणी हाती झेंडा घेऊन मोर्चाला निघालेला !

अन् या साऱ्या मेळाव्यात मध्यभागी मांडी ठोकून डोळे मिटून बसलेला तो मांत्रिक आमच्या स्थानिक वाटाड्यानं त्या मांत्रिकाचं वशीकरण करायचा निष्फळ प्रयत्न चालवला होता, पण त्या हुडिनीला बहुधा पूर्ण भरलेल्या प्रेक्षागृहापेक्षा कमी प्रेक्षक चालत नसावेत, त्यामुळे असल्या चार-पाच लोकांच्या फुटकळ 'ऑडियन्स' पुढे प्रयोग सादर करायला त्यानं चक्क नकार दिला उघड्या छातीवर रुळणाऱ्या कव-ड्यांच्या माळा कुरवाळत तो स्वस्थ बसून राहिला अन् मी अस्वस्थ होऊन झोपडीत इकड-तिकड हिंडत राहिले

स्थानिक भाषेत आणखी बरीच चर्चा झाली अन् मग त्यानं आम्हाला त्या लाकडी पुतळ्यांचे शॉट्स घ्यायला परवानगी दिली. ते चालू असतानाच कुणी तरी एक आजारी मूल त्या मांत्रिकाच्या पुढ्यात आणून ठेवलं. त्याच्या 'औषधा'ची वेळ झाली असावी मांत्रि-कानं उपचाराची तयारी केली एका बाटलीतून कसलं तरी तेल काढून त्यानं ते मुलाच्या अंगावर चोपडलं मग कसल्याशा झाडपाल्याचा कुंचा त्याच्या अंगावरून पुन्हा पुन्हा झटकला अन् त्याच्या पोटावर, पाठीवर जोरानं दाबत कसले तरी मंत्र म्हटले

एवढं झाल्यावर बहुधा त्याच्या ओ पी डी ची वेळ संपली असावी, कारण तो घाईघाईनं उठला अन् व्हिजिटसाठी गावाकडे निघून गेला मग आम्हीही त्या लाकडी मेळाव्याचा निरोप घेऊन झोपडीबाहेर पडलो

तरासा बेटावरून निघून ग्रेट निकोबारच्या दिशेनं जाताना वाटेत भेटणाऱ्या साऱ्या बेटांना आम्ही गुंगारा दिला होता. त्यामुळे आता परतीच्या प्रवासात त्यांचा समाचार घेणं आवश्यक होतं

कचाल, कॅमोर्ता, चॅम्पीन ही सारी छोटी छोटी बेटं म्हणजे एक-मेकांची चुलत भावंडंच ! भौगोलिक परिस्थिती, स्थानिक लोकजीवन, वाढती आधुनिकता या साऱ्या बाबतीत या सगळ्याच बेटांचा चेहरा-मोहरा खूपसा मिळता-जुळता आहे बोलीभाषाही एकच आहे.

या साऱ्या बेटांवर निकोबारी जमातीचे लोक राहतात. एक ते तीन हजार वस्तीच्या या बेटांवर आधुनिक सुधारणांच्या पाऊलखुणा

जागोजागी दिसतात जीपमधून हिंडणाऱ्या, सफाईदार इंग्लीश बोलणाऱ्या अन् संध्याकाळी व्हिस्की पिणाऱ्या निकोबारींना 'आदिवासी' पणाचं लेबल चिकटवणं जरा विसगतच वाटत.

नानकौरी ऊर्फ Muot हे इथलं सर्वांत महत्त्वाचं बेट कुठल्याही स्थापत्यशास्त्रज्ञानं मान तुकवावी असं सुंदर बंदर निसर्गानं या बेटावर तयार केलं आहे. जगातल्या सर्वोत्तम नैसर्गिक बंदरांपैकी नानकौरी हे एक !

ट्रिंकॅट, कॅमोर्ता अशी छोटी छोटी बेटं नानकौरीच्या बंदराभोवती पहारेकऱ्यासारखी उभी आहेत तरासा-चौरावर आक्रस्ताळेपणा करणारा समुद्र इथल्या पहारेकऱ्याच्या कडक नजरेसमोर गुपचूप बसलेला असतो. शाळेत हिटलरशाही करणाऱ्या मास्तरानी झेड् पी च्या अधिकाऱ्यां-समोर खाली मान घालून उभ राहाव ना, तसाच !

फाटक उघडून बागेत शिराव तसच दोन बेटांच्या मधल्या कमानी-तून जहाज नानकौरीच्या बंदरात शिरत तेव्हा आपण समुद्राऐवजी सरोवरात असल्यासारखच वाटतं.

चॅम्पीन बेटावर राहणारी राणी लक्ष्मी हे या भागातल बड प्रस्थ. आज ७०–८० वर्षांच्या असणाऱ्या या राणीन पूर्वी या भागात समाज-सुधारणेच खूप काम केल म्हणतात. जाता जाता तिच्याकड अत्तर-गुलाब घेऊन आम्ही पुढ निघालो.

इथ वाटेत एक 'अमृततुल्य' दिसल्यावर माझे पाय आपोआप थांबले. सतत 'नारियल पानी' पिऊन कटाळलेल्या जिभेला चहाच्या आठवणीनच पाणी सुटल. अमृततुल्य भुवनमध्ये पाऊल टाकल तर काय! अनेक मुंबईकर मित्र-मैत्रिणी तिथ ठाण मांडून बसलेल्या सार दुकानच त्यांनी व्यापून टाकल होत. कोण नव्हत त्यात? सारेच होते– अमिताभ, राजेश, मिथुन, झीनत, शबाना, हेमा, अगदी केटी मिर्झासुद्धा! या साऱ्या मंडळींना एक सामुदायिक नमस्कार ठोकून मी परत फिरले.

पोर्टब्लेअरहून आदल्या रात्री निघालेली आमची मोटार बोट 'मिलाले' ड्यूगाँग क्रीकच्या धक्क्याला लागली तोवर उन्ह बरीच वर

अं...४

आली होती. अर्थात वर-खाली होणारं हे उन्हाचं गणित अदमानमध्ये हटकून चुकायच कारण इथला सूर्योदय होतो साडेचार वाजता! त्यामुळे कधी कडक उन्हान डोक तापल की, वैतागून घड्याळात पाहाव तर सहा किंवा सात वाजलेले असतात.

तर आमच्या दृष्टीन 'भल्या पहाटे' आम्ही ड्यूगांग क्रीकला पोहोचलो. नेहमीच्या सरावान मी धक्क्यावर उतरून तडक वस्तीची वाट पकडली.

दूरवर वस्तीच्या झोपड्या दिसत होत्या ही वस्ती होती ओंगे (Onge) जमातीची लिटल अदमानमधील ही ओंगे जमात नेग्रिटो वशाची तुकतुकीत काळा रग, राठ कुरळे केस आणि मध्यम उची अस याच रूप आफ्रिकी लोकांची आठवण करून देतं

हे लोक पूर्णपणे निसर्गावर विसबून राहणारे. जगलात मिळणारी शिकार, कदमुळ, मध आणि फळं यांवर गुजराण करणारे अजूनही त्याना शेतीची कल्पना पसंत पडत नाही. आजकाल मात्र मायबाप सरकार त्यांना शिधा पुरवतं या स्वछदी लोकांना आता सरकारन लाकडी झोपड्यांच्या वसाहतीत राहायला शिकवलय त्यांच्यासाठी एक शिक्षण केंद्र आणि एक वैद्यकीय मदत केंद्रही चालवलंय पण या आधुनिकतेच पॉलिश खरवडून पाहिल तर त्याखालचा आदिवासी सहज नजरेत भरतो

आजही इथले बहुसंख्य लोक अंगाला माती फासून हिंडताना दिसतात अंगावर रगीत मातीचे थर थापून त्यावर चित्रविचित्र नक्षी काढणे हा यांचा आवडता उद्योग. कीटकदशापासून बचाव करायला या मातीचा उपयोग होतो म्हणे! पूर्वी ही नक्षी काढताना आरशाची जरूर पडली तर एका मोठ्या शिपल्यात पाणी भरून त्याचाच आरशासारखा उपयोग हे लोक करत असत

मध गोळा करणे हा यांचा दुसरा आवडता उद्योग मधाचं पोळं शोधत मैलन् मैल जंगल तुडवायला यांची नेहमीच तयारी असते. या कामगिरीवर जाताना कुठल्याशा विशिष्ट झाडपाल्याचा रस ते सगळ्या अंगावर चोपडतात, त्यामुळे त्यांना एकही मधमाशी चावत नाही इथल

केशकर्तनालयही मोठं मजेशीर असतं. धारदार शिंपल्यानं केसांची मूळं खरवडून काढतात. यामुळे साऱ्यांचे 'क्रू कट' कसे आखीव असतात

इथले पुरुष भडक रंगाच्या हाफपॅन्ट घालून हिंडतात, पण स्त्रिया मात्र अजूनही जुनी परंपरा राखून आहेत. गवताचा मोठ्ठा गोंडा कमरे-भोवती दर्शनी भागावर बांधला की इथल्या स्त्रियांची वेशभूषा संपते आजकाल क्वचित एखादी स्त्री लुंगीवजा परकर नेसलेली दिसते, पण यापलीकडे दुसऱ्या वस्त्राची आवश्यकता तिलाही फारशी वाटत नाही.

अन् या साऱ्या पार्श्वभूमीवर कुठं तरी पायरीवर बसून हातातल्या पाटीवर अ आ इ ई गिरवणारा एखादा माणूस किंवा ब्रश व पेस्ट घेऊन दात घासणारा एखादा मुलगा पाहिला की खूप गंमत वाटते. इथली सर्व लहान मुलं मातीच्या उटीनं मढवलेली असतात, आई नेहमीच मुलांना पाठीवर बांधून वावरत असते

ओंगेच्या पूर्वजांना विस्तव पेटवायचं माहीतच नव्हतं. जंगलात वीज पडून किंवा फांद्या घासून अग्नी निर्माण झाला तर ते लाकडं टाकून ती आग सतत जळत ठेवायचा प्रयत्न करीत व त्यापासूनच विस्तव पेटवत कुठं प्रवासाला जाताना किंवा वस्ती बदलताना ती जळती लाकडं त्यांना बरोबर न्यावी लागत. या साऱ्या प्रयोगामुळं जंगलात बऱ्याचदा वणवे पेटत असत हे मुद्दाम सांगायला नकोच.

आपल्या कुटुंबातल्या व्यक्तीचं प्रेत आपल्याच झोपडीत पुरून टाकण्याची पद्धत पूर्वी या जमातीत होती. माणसांच्या अन् प्राण्यांच्या दातांचे चपलाहार किंवा तन्मणी करून घालण्याचीही यांना पूर्वी फार हौस असायची

पूर्वी इथल्या 'पेशंट' चे अगदी हालच असायचे. तापानं फणफणलेल्या रोग्यासाठी ओंगे डॉक्टरकडे एक जालीम उपाय होता. तो म्हणजे या रोग्याच्या सर्वांगाला माती फासायची अन् मग त्याच्या साऱ्या अंगा-भोवती दोरीचे अनेक वेढे देऊन त्याला करकचून बांधून टाकायचे जेवढा ताप जास्त तेवढे वेढे जास्त ! अशा ठिकाणी आजारी पडायला सुद्धा केवढे धैर्य लागत असेल, नाही ?

अशा कितीतरी जुन्या चालीरीती ओंगेच्या नव्या पिढीनं 'कटाप'

करून टाकल्या आहेत आणि काही नव्या गोष्टी आत्मसात केल्या आहेत. त्यामुळ इथल्या जीवनात नव्या-जुन्या संस्कृतीचं एक मजेदार मिश्रण पाहायला मिळत.

गवती गोंडयाच्या परंपरागत 'वेशभूषे' मध्ये सजलेली एखादी स्त्री प्लॅस्टिकच्या वायरची टोपली विणत बसलेली असते तर झोकदार घड्याळ मनगटावर बांधलेला एखादा माणूस जुन्या पद्धतीने खेक-ड्याच्या पायाचा पाईप ओठात धरून धूर सोडत असतो. टेरिलीनची बेलबॉटम घालून हिंडणाऱ्या कुणा माणसाचे उघडे अंग मोहरमच्या वाघासारखे मातीच्या पट्ट्यांनी सजलेले असते. केवळ परकर नेसलेली कुणी एकवस्त्रा माथ्यावर रंगीत छत्री धरून उन्हात हिंडत असते

सूर्य माथ्यावर आला. उन्हाचा वणवा पेटला तसा ओंगे लोकांचा शूटिंगमधला उत्साह मावळतीकडे झुकला. आमच्या रंगीबेरंगी नजराण्यां-कडे दुर्लक्ष करून सारे लोक आपापल्या झोपड्यात विसावले मग आम्हीही 'इंटरव्हल' करायचं ठरवलं कॅमेरे खांद्यावर टाकून आम्ही पेंगुळलेल्या ड्युगांग क्रीकचा निरोप घेतला अन् आमची 'मिलाले' हट बेच्या दिशेनं चालू लागली.

हट बेच्या धक्क्यावर एक ट्रक उभा होता. त्यात बसून आता आम्ही जॅकसन क्रीककडे निघालो होतो घनदाट जंगलातल्या वाकड्या तिकड्या वाटेनं ठेचकाळत आमचा ट्रक चालला होता दुतर्फा उभे असलेले शंभर-शंभर फूट उंचीचे वृक्ष आकाशाला हात लावायला अधीर झाले होते. राजाच्या अंगावर मोत्याचे अलंकार रुळत असावेत अशा नाजूक वेली या वृक्षराजांच्या अंगाखांद्यावर विलसत होत्या. वाढत्या जंगलतोडीला बळी पडलेले काही वृक्ष धारातीर्थी पडलेल्या योद्ध्यां-सारखे रस्त्यावर आडवे पडले होते.

या साऱ्यातून वाट काढत आमचा ट्रक चालला होता. काही वेळानं रस्त्यात एक रुंद नाला आडवा आला. ओहोटीची वेळ असल्यानं नाल्यात फार पाणी नव्हतं त्यामुळे सहजपणे नाला ओलांडून आम्ही पुढं निघालो.

बऱ्याच वेळानं जॅकसन क्रीकच्या ओंगे वस्तीत पोचलो तोवर

सारेच पंक्चर झालेल्या टायरसारखे गलितगात्र झाले होते. पण वेळ घालवून चालणार नव्हतं भरतीच्या पाण्यान नाल्याचं पोट फुगण्याच्या आत इथून बाहेर पडायला हव होत. त्यामुळे मी भराभर कामाला लागले

इथले दोन ओंगे तरुण धनुष्यबाण घेऊन मच्छीमारीला निघाले होते. अचूक निशाण साधून पाण्यातल्या माशाची शिकार करण्याच हे शरसधान पाहून मला द्रौपदीच्या मत्स्य यत्राची आठवण झाली.

जॅकसन क्रीकची वसाहत अजून पूर्ण बांधलेली नाही, त्यामुळे बहुतेक मडळी अजून समुद्रकाठी आभाळाखाली खाटा माडून ससार करतात पत्र्याचे जुने डबे, लहान-मोठ्या बाटल्या, प्लॅस्टिकच्या बादल्या, मळके कपडे असा सारा कौटुबिक खजिना खाटेखाली दडवलेला असतो. हळूहळू झोपड्याचे सांगाडे भिंती-छपरान सजतील अन् मग ही सारी मडळी गृहप्रवेश करतील. पण सध्या तरी त्यांना अशा उघड्या-वाघड्या ससाराची खत वाटतेय अस दिसत नाही.

खर सागायच म्हणजे या साऱ्या लोकांना सध्या एकच खत वाटतेय. एक प्रश्न भेडसावतोय तो म्हणजे लोकसख्येचा ! साऱ्या हिंदुस्थानला छळणाऱ्या या समस्येच स्वरूप मात्र अगदी उलट आहे.

काही वर्षांपूर्वी ओंगे जमातीची लोकसख्या केवळ ९७ होती. मर्यादित आयुष्यमान, अनारोग्य आणि घटती जन्मसख्या यामुळ ही जमात हळूहळू विनाशाच्या मार्गान चाललीय की काय अशी शका या साऱ्यानाच छळतेय. वैद्यकीय मदत आणि इतरही सर्व साहाय्य देऊन इथलं शासन या समस्येवर मात करायचा प्रयत्न करतय यासाठी आणखी काय उपाय करावेत याची चर्चा एकदा चालू होती तेव्हा ओंगे जमातीचा प्रतिनिधी पुढ आला अन् त्यान खणखणीत स्वरात आपली मागणी पुढ मांडली, " लडकी मगता ! " त्याच्या या गुगलीन साऱ्या समाजसेवकांना क्लीन बोल्ड करून टाकल होत हे त्या बिचाऱ्याला काय माहीत !

# पश्चिम किनाऱ्यावरील निसर्गपुत्र

अश्मयुगाकडून अणुयुगाकडे धावणाऱ्या मानवाची अधीर पावलं कधी तरी अचानक अडखळतात अत्याधुनिक भविष्याची स्वप्नं पाहणार त्याच मन भूतकाळाच्या अधुक पायवाटेवर रेंगाळत राहत. मग तो कधी इतिहासाची पान चाळतो, कधी स्मारक उभारतो, तर कधी खाद्यावर कुदळ घेऊन प्राचीन अवशेष धुंडाळत राहतो. पृथ्वीच्या पोटात सापडलेले हे भूतकाळाचे साक्षीदार एखाद्या म्युझियममध्ये तो मोठ्या अभिमानान माडून ठेवतो.

अंदमान-निकोबार हे असच मोठ संग्रहालय आहे—पण मानवान नव्हे, तर निसर्गान निर्माण केलेल ! अश्मयुगापासून अणुयुगापर्यंत मानवान केलेल्या साऱ्या प्रवासाचा नकाशाच इथ मांडून ठेवला आहे प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत सांस्कृतिक उत्क्रांतीच्या साऱ्या पाऊलखुणा इथ स्पष्ट दिसतात निसर्गपुत्रापासून विद्वान पुत्रापर्यंत मानवाची सारी बदलती रूप इथ पाहायला मिळतात

कुशल शिल्पकारान आपल्या कलाकृतीच प्रदर्शन माडाव तसच आपल्या निर्मितीच एक चालत-बोलतं प्रदर्शनच इथ मांडून ठेवल आहे. प्रत्येक बेट म्हणजे जणू एक शो-केस !

दुर्मीळ वस्तूची शो-केस नेहमी दुरूनच पाहायची असते. उत्तर सेंटिनल बेट ही अशीच एक शो-केस दुरूनच पाहण्याची !

काही लोकाना शेजाऱ्यान आपल्या घरात नुसत डोकावून पाहिल तरी राग येतो. नॉर्थसेंटिनल बेटावरचे सेंटिनलीज लोकसुद्धा असेच एखाद चुकल-माकल होडग जरी त्यांच्या बेटाच्या आसपास फिरकल

तरी हे लगच धनुष्यबाण घेऊन उभे राहणार. त्याला हाकलून द्यायला बाहेरून येणाऱ्या प्रत्येक परकीय शत्रूला उदार आश्रय देणारी भारतीय आतिथ्यशीलता या सेंटिनलीजना अजून कळलेली दिसत नाही

दक्षिण अदमानच्या पश्चिम किनाऱ्यापासून जरा दूर समुद्रात हे उत्तर सेंटिनल बेट एकटच उभ आहे– रुसलेल्या मुलान आपल्या खेळगड्याना सोडून कोपऱ्यात फुरगटून बसाव तस !

या बेटावर राहणारे आदिवासी अजूनही अश्मयुगीन काळातच वावरतात. नेग्रिटो वंशाचे हे काळे कुळकुळीत लोक संपूर्ण निसर्गावस्थेतच राहतात धनुष्यबाण हे त्याच शस्त्र त्याच्या सहाय्याने आत्मसरक्षण करीत, निसर्ग देईल त्यावर समाधान मानून हे लोक गुजराण करतात. या बेटावर असे साधारण १०० लोक असावेत

अर्थात ही सारी माहिती 'दूरदर्शना'तून मिळवलेली बाहेरचा कुणीही माणूस आजपर्यंत या बेटावर उतरू शकलेला नाही.

दहा वर्षांपूर्वी या बेटाजवळ जाऊ पाहणाऱ्या फिलम युनिटला त्याच्या बाणाचा प्रसाद मिळाला होता हे मला माहीत होत. आज दहा वर्षांनतर त्याच जुन्या नाटकाचा नव्या सचातला नवा प्रयोग सादर करून पाहावा अशी माझी इच्छा होती

आजकाल कधी कधी एखादं होडग बेटाच्या किनाऱ्यावर थोड्या भेटवस्तू टाकून लगेच परत फिरल तर त्याची फारशी हरकत नसते अस कुणी तरी सांगितल्यावर माझ्या उत्साहाला उधाण आल भेटवस्तू टाकणाऱ्या माणसानी किनाऱ्यावर थाबण्याचा बेत केला तर मात्र झाडीत लपलेल सैन्य त्याचा 'मुर्दाबाद' करून टाकत हा त्या बातमीचा पुढचा परिच्छेद मी सोयीस्कररीत्या काढून टाकला अन् भेटवस्तूच सूत्र धरून मी मुख्य सचिव सागर याच्या कचेरीत पोचले

आमच्या लॉंचन दूर समुद्रात उभ राहावं, भेटवस्तू टाकायला जाणाऱ्या होडीन इतर वस्तूबरोबर मला एकटीला त्या किनाऱ्यावर सोडून याव अन् नंतर त्या लोकाची अनुकूल प्रतिक्रिया दिसली तर इतरांनी हळूहळू बेटाजवळ याव असा सनसनाटी बेत मी आखला होता. एकाकी नि शस्त्र स्त्रीबद्दल त्याना भीती किंवा वैरभाव वाटणार नाही. केवळ

कुतूहलान का होईना, पण धनुष्यावरचे हात थबकतील अशी मला खात्री होती–विनाकारणच !

हे सार मी सागर साहेबाना समजावून सांगितल. आतापर्यंत माझ्या अनेक चित्रविचित्र मागण्या शांतपणे ऐकून घ्यायची त्याना सवय झाली होती. पण आता मात्र त्यांनी चक्क कपाळाला हात लावला.

माझा हा नवा प्रयोग 'शोले' सारखा हिट झाला किंवा 'फ्लॉप' झाला तर दोन्ही परिणामाची जबाबदारी घ्यायची माझी तयारी होती–पण त्याची नव्हती. त्यामुळें सराईत संपादकान आपल्या टेबलावरचं टुकार नवकाव्य कचऱ्याच्या टोपलीत टाकाव तेवढ्याच सहजपणे सागर साहेबानी माझ्या त्या रोमांचकारी योजनेचा निकाल लावला गावस-करन चेंडू टोलवावेत तसे त्यानी माझे सारे युक्तिवाद टोलवून दिले.

शेवटी मीही वैतागले. म्हणाले, "सार जाणूनबुजून मी धोका पत्करायला तयार आहे तर त्याला तुमची हरकत काय म्हणून ?"

त्यानी शांतपणे उत्तर दिल, "माझी काहीच हरकत नाही अन् त्या सेंटिनलीज लोकाचीही काही हरकत असणार नाही. मला खात्री आहे की, ते तुलासुद्धा एक छानशी भेटवस्तू समजून आनंदाने स्वीकारतील. पण एक लक्षात ठेव–एकदा मिळालेली भेटवस्तू परत पाठवण्याची पद्धत नाही त्यांची. तेवढीच भीती आहे मला !"

शून्यावर त्रिफळा उडाल्यावर 'कसोटीवीरा'न तंबूत परताव तशी मी त्यांच्या कचेरीतून परत फिरले.

सेंटिनलीज लोकासारखेच दुसरे भांडकुदळ लोक म्हणजे जारवा.

अंदमानच्या पश्चिम किनाऱ्यावरच्या निबिड अरण्यात हे लोक राहतात शिकार आणि मासेमारी करून जगणारे हे लोकही नेग्रिटो वंशाचे असल्याने काळ्या रंगाचे, कुरळ्या केसाचे अन् मध्यम उंचीचे असतात. यांच्याशी दोस्ती करण्याचे सरकारी प्रयत्न अजून तरी फारसे यशस्वी झालेले नाहीत. जंगलाबाहेरच्या लहानसहान वस्त्यावर हल्ले करणे, जंगलात चुकलेल्या एकट्या-दुकट्या माणसावर निशाणबाजी करणे असे उद्योग ते नेहमीच करत असतात. कधीमधी एखादा धनुर्धर वस्तीतल्या बंदुकीलाही बळी पडतो. हे प्रकार थांबवण्यासाठी आता

'बुश पोलिस'ची खास यत्रणा उभारली आहे.

याच जारवा जमातीचा एक छोटा परिवार छोटालीग बँक नावाच्या बेटावर वस्ती करून राहतो. हे लोक आपल्या इतर भाईबदां-एवढे तुसडे नसावेत, कारण कधीमधी भेटवस्तू घेऊन जाणाऱ्या होडीचं इथं बऱ्यापैकी स्वागत होत.

पण अजूनही त्याना सस्कृतीचा पुसटसा स्पर्शही झालेला नाही. गुहेत राहणाऱ्या मानवान त्यानतर काही प्रगती केली आहे याची याना अजून खबरसुद्धा नाही.

सेंटिनेलीज आणि जारवा या दोन्ही जमातींबद्दल विचार कर-ताना मला नेहमी वाटत की, विज्ञानसामर्थ्यानि उन्मत्त झालेल्या मान-वाला आपल्या सत्य स्वरूपाचा विसर पडू नये म्हणूनच निसर्गान या जमातींना आपल्या कुशीत जपून ठेवल असाव. आदिमानवाच्या पुत्रांनी प्रगतीच्या धुदीत आपली जन्मकथा विसरू नये असच निसर्गाला सुच-वायच असेल का ?

ब्रिटिशानी अदमानमध्ये वसाहती केल्या तेव्हा पूर्व किनाऱ्याचा सारा भूभाग अंदमानी जमातींनी व्यापला होता. गोऱ्या वसाहतखोरानी बरोबर आणलेल्या बदुकींनी अदमानी जमाती जवळजवळ नष्ट झाल्या. आज या जमातींपैकी एकाच शाखेचे २६ लोक कसेबसे तग धरून आहेत हेही नेग्रिटो वशाचे आहेत.

पूर्व किनाऱ्यावरच्या स्ट्रेट बेटावर या लोकांसाठी सरकारी वसा-हत केलेली आहे. छोटचा लाकडी झोपडयातून आता हे लोक राहतात. त्यांच्यात अजूनही अनारोग्याच प्रमाण फार मोठ आहे त्यामुळे इथ जन्माला येणारी बालक नेहमीच अल्पायुषी ठरतात. अशा परिस्थितीत ही जमात हळूहळू नामशेष होईल की काय, ही चिता सध्या इथल शासन करत असत. सुदैवान गेल्या वर्षी तिथ एका बालकाचा जन्म झाला. ही बातमी तिथल्या आकाशवाणीन मोठ्या आनदान सागितली.

स्ट्रेट बेटावरच्या या अदमानींना तबाखू खाण्याच प्रचड व्यसन आहे. त्यामुळे साऱ्याचेच दात काळे कुळकुळीत. पण आश्चर्य म्हणजे इथल्या काही जमातीत काळे दात हे सौंदर्याच लक्षण मानतात. ज्या

स्त्रीचे दात सर्वांत जास्त काळे ती इथली ब्यूटीक्वीन

तबाखूप्रमाणेच अफूच्या मोहिनीतही इथले बहुसख्य लोक गुगलेले असतात.

जारवा आणि अदमानी या जमातीत पिढीजात वैर. या बाबतीत हे लोक अगदी चबळच्या पाण्यावर वाढले असावेत अशाच कडवेपणाने वागतात. वसाहत करणाऱ्या गोऱ्यानी या वैराचा अगार आपल्या मदतीची फुकर घालून जास्तच फुलवला. अदमानी जमातीच्या हाती बदुका देऊन त्यांनी तिरसट जारवाचा काटा काढायच ठरवल.

परिणाम एवढाच झाला की अदमानी जमात नामशेष होण्याच्या मार्गाला लागली आणि चिडलेले जारवा जगलात परागदा झाले. त्याच्या मनातला भडकलेला वैराग्नी आज इतक्या वर्षांनतरही तसाच धगधगत आहे,त्यामुळेच की काय त्यांच्यासाठी पुढे केलेला मदतीचा हात ते नेहमीच झिडकारून टाकतात.

काही वर्षांपूर्वी उरल्यासुरल्या अदमानींना गोळा करून स्ट्रट बेटावर त्यांची वसाहत केली इथ वीज, पाणी, वैद्यकीय मदत अशा साऱ्या आवश्यक सोयी केलेल्या आहेत साक्षरता प्रसार, स्वच्छता, हस्तकला अशा काही गोष्टी त्यांना इथ शिकविल्या जातात पण या साऱ्या प्रयत्नाचा अनुकूल परिणाम तरी फारसा दिसून येत नाही अजूनही याची सख्या हळूहळू कमीच होत असलेली दिसते.

६८
अ.प्र. २५०६६
ता. १।८।८६

# उधळण आठवणींच्या रंगांची

सध्येचा शीशमहाल झगमगत असतो. निळ्या गालिचावर नाजूक पावलं टाकत एक शुभ्र मेघमाला त्या महालात येते अन् क्षणभर थबकून समुद्राच्या सोनेरी आरशात स्वतःच रूप निरखते दूर उभा असलेला सूर्य तिच्याकडे एक तिरपा कटाक्ष टाकतो त्यासरशी ती मेघमाला उगीचच लाजून लाल होते अन् आपला रेशमी पदर सावरीत लगबगीने महालाबाहेर पडते.

माझी नजर खाली वळते बंदराच्या धक्क्यावर माणसांची धावपळ चालू असते प्रवाशांचा आरडाओरडा, हमालांची भांडणं, सामानाची आदळआपट या साऱ्यांच एक विचित्र मिश्रण वातावरणात घोंघावत असतं, पण त्यातलं काहीच माझ्या कानांच फाटक ओलांडून मनाच्या गाभाऱ्यापर्यंत पोचत नसत. त्या गाभाऱ्यात साठलेली असते एक अपार शून्य पोकळी !

जहाजाच्या डेकवर उभं राहून मी पोर्ट ब्लेअरच्या बंदराकडे, शहराकडे पाहत होते मला आठवत, चांगल्या-वाईट 'आशीर्वादा' चं गाठोडं खांद्यावर टाकून मी या अपरिचित किनाऱ्यावर उतरले होते. त्यानंतर तीन महिन्यानी आज अनेक आठवणींचा खजिना घेऊन मी परतीच्या प्रवासाला निघाले होते,

जहाजाचा भोंगा वाजतो. नेहमी कर्कश वाटणाऱ्या त्या आवाजाला आज कारुण्याच अस्तर असत जड पावलांनी जहाज बंदरापासून हळूहळू दूर होत, पण त्याची लांबलचक सावली मात्र अजूनही हट्टीपणान बंदरावरच रेंगाळत असते

नेहमी खट्याळपणा करणारा समुद्र आज 'देवदास' बनलेला असतो स्वतःशीच काही तरी गुणगुणत अनिर्बंध धावणाऱ्या अवखळ लाटा आज पाऊलसुद्धा न वाजवता गुपचूप वावरत असतात.

वातीच्या धुरान कंदिलाची काच काजळाशी तशी स्मृतींच्या धुरान मनावर औदासीन्याची काजळी जमत राहते हातातली नळी फिरविली की काचेच्या तुकड्याची नक्षी क्षणाक्षणाला बदलत रहावी तसेच आठवणींचे अनेक स्पष्ट-अस्पष्ट आकृतिबंध मनात तरळत राहतात– स्मृतींची कवाड उघडून कितीतरी चेहरे हळूच बाहेर डोकावतात, काही परिचित, तर काही अनामिक.

हा एक चेहरा– कार-निकोबारमध्ये भेटलेला. टुकार विनोदावरसुद्धा गडगडून हसणारी ही उत्साहमूर्ती बरोबर असली की शूटिंगच रूपातर जत्रेत होणार हे ठरलेल.

हा दुसरा चेहराही कार-निकोबारचाच पण कसा अगदी गभीर–विचारी ! 'तुम्ही फिल्मवाल्यानी साऱ्या दुनियेला बिघडवून टाकलय' अस मला ठणकावून सांगणारा.

अन् हा एक बेरकी चेहरा 'आम्ही काय बुवा, बोलूनचालून आदिवासीच !' अस म्हणत सोयीस्कररीत्या आदिवासीपणाची घोंगडी पांघरून असलेला. कुठ भेटला बर हा? कचाल बेटावरच ना ?

हा मिस्किल हसरा चेहरा त्या शॅम्पेन 'हीरो'चा हे लाजरं, अस्पष्ट हसू त्या ओगे मुलीच्या चेहऱ्यावरच. छावणीच्या तबूतबूतून डोकावून आम्हाला न्याहाळणार कुतूहल पिग्मॅलियनच्या कॅपमध्ये भेटल. आमचे आईवडील कोल्हापूरचे, पण आम्ही मात्र अजून दादा कोंडक्याच एकपण पिक्चर पाह्यल नाही ही तक्रार कॅपबेल बे मधल्या एका शाळकरी पोरान ऐकवलेली.

"मॅडम, काय वाटेल ते काम सांगा, पण मला तुमच्याबरोबर मुबईला घेऊन जा" हा हट्ट एका आदिवासी पोरीन धरलेला

कितीही धागे उडू लागले तरी आठवणीचा गुता सुटणार नसतो. मी मात्र वेड्यासारखी प्रत्येक भाग हाती धरून त्याचा पोत, त्याचा रग निरखीत बसते.

अजूनही माझ्या मनात किणकिणत असत एक अवखळ हसू— जगलातल्या निसर्गपुत्रांचं. पण वाटत की या निर्व्याज हास्याला काही भविष्यकाळ असेल का ? कधी काळी पुन्हा परतून मी या किनारी आले तर तोवर हे हसू असच किणकिणत राहील की हरवून जाईल ? मलेरियान पोखरलेली शरीर कुठपर्यंत तग धरतील ? रजल्यागाजल्या— दीनदलितांसाठी कळवळणार मायबाप सरकार या निसर्गपुत्रासाठी कधी द्रवणार नाही का ?

कागदोपत्रींच्या योजना पाहिल्या तर सार 'आलबेल' आहे

या आदिवासींना शहराशी सपर्क सहज साधता यावा म्हणून या भागात पक्का रस्ता बाधला आहे, पण त्या रस्त्यान आदिवासी शहरात आलेला नाही. उलट शहरी माणसानीच जगलावर आक्रमण सुरू केलं. जगलसपत्तीची लुटालूट करण, आदिवासींकडच्या मध वगैरे वस्तू पळवण, आदिवासी स्त्रियांना त्रास देण असे आधुनिक प्रकार सुरू झाले, कधीकाळी सरकारी अधिकाऱ्यानी आदिवासींना वाटलेल्या लुग्या आणि बनियन्ससुद्धा या आक्रमणातून वाचले नाहीत हे सारे प्रताप पाहिल्यावर त्या निसर्गपुत्रांनी आपल्या शहरी भाईबदांचा धसका घेतला असेल तर त्यात काय नवल ?

आज या लोकांना तातडीची गरज आहे ती वैद्यकीय मदतीची. अपुरा निकृष्ट आहार, दूषित पाणी, त्वचारोग, साथीचे रोग या साऱ्यांनी पिडलेल्या या जमाती आधुनिक वैद्यकीय मदत मिळाली तरच जिवत राहतील, नाही तर आणखी काही वर्षांत हे सारे निसर्गपुत्र नामशेष होतील

गलातिया नदीच्या काठी आदिवासी क्षेत्रात एक इमारत बांधणार आहेत अस ऐकल ती दवाखान्यासाठीच असणार या कल्पनेनं मला थोड समाधान वाटल तेवढ्यात तिथला समाजसेवक अभिमानान म्हणाला, "मॅडम, ही इमारत येत्या तीन-चार वर्षांत पूर्ण होईल मग आम्ही तिथ शाळा भरवणार, या अनाडी लोकांना लिहायला-वाचायला शिकवणार."

आज आजूबाजूला उघड्या हिंडणाऱ्या आदिवासी मुलांपैकी किती

जण या शाळेत नाव दाखल करायला जिवत राहतील हे तो समाजसेवक जाणे !

शहरातल्या मोठ्या अधिकाऱ्याची पत्नी एक दिवस मला सांगत होती, "अय्या ! किती गरीब बिच्चारे लोक नाही का ? मी ना तर ह्यांना नेहमी सांगते की आपण एखाद्या रविवारी तिकडेच पिकनिक करू या. मी किनई या लोकांना किचन गार्डन लावायला शिकवणाराय. किती छान किनई ?" ऐकता ऐकता मला पु. लंच्या अतिविशाल महिला मंडळाची आठवण झाली.

या जंगलात हिंडताना मला जाणवलं की आपण कितीही उच्च, उदात्त वगैरे हेतूंनं तिथं गेलो तरी त्या निसर्गपुत्राच्या दृष्टीनं आपण 'घुसखोर'च असतो त्यामुळे त्यांचा विश्वास संपादन करणं ही मदत-कार्याची पहिली पायरी

यांत्रिकेचे दोन-तीन कामगार केळ्याच्या बागेची मशागत करण्या-साठी जंगलात झोपडी बांधून राहतात पूर्वी जंगलात लपलेले डोळे त्यांना सतत न्याहाळत असत हळूहळू भीड चेपली शहरी पाहुण्यांच्या अस्तित्वाची सवय झाली तसे निसर्गपुत्र झाडीतला आडोसा सोडून बाहेर पडले असाच कधी तरी त्यांच्या मनात विश्वास निर्माण झाला अन् मग ती झोपडी म्हणजे त्यांचं 'गेस्ट हाऊस' बनली. तंबाखू, केळी, विडी-काडी यांच्या मागणीसाठी हे निसर्गपुत्र आता बेधडक झोपडीमध्ये घुसतात. तिथल्या कामगारांत मिसळून कधी दाल-भात' सुद्धा खातात

हा धडा गिरवून जंगलात ठिकठिकाणी अशी मदत केन्द्र उभा-रली तर कालांतराने आदिवासी पावलं त्या दिशेला वळतील. मग अशा केन्द्रातून त्यांना आवश्यक ती वैद्यकीय मदत, कपडे, अन्न पुरवता येईल

पण ही चार दिवसांत पार पडणारी योजना नव्हे त्यासाठी जरूर आहे निष्ठावान समाजसेवकाची सध्या इथं दोन समाजसेवकांची नेमणूक केलेली आहे—अन् तीसुद्धा समाजसेवक ऊर्फ प्राथमिक शिक्षक अशा डबलसीट ड्यूटीवर. अर्थातच या दोन्हीपैकी कुठलंच काम धड होत नाही हे वेगळं सांगायला नकोच.

लिट्ल अंदमानच्या ओंग जमातीची कहाणी थोडी वेगळी पण

अशीच व्यथित करणारी !

लिटल अदमान हे निसर्गसपन्न बेट इथल्या घनदाट जगलात मन-सोक्त शिकार करत, कधी मधाची मेजवानी झोडत हे ओंगे लोक स्वच्छद हिंडत असायचे.

पण त्याच हे स्वातत्र्य फार काळ टिकल नाही बेटावर वस्ती वाढली जंगलतोड सुरू झाली तशातच बांगला देशच्या निर्वासितांनी इथ ठाण माडलं या वाढत्या गजबजाटाने आदिवासी बावरून गेले. जगलातल त्याच साम्राज्य सपुष्टात आल शेतीच्या निमित्तान निर्वा-सितांनी केलेल्या जगलतोडीमुळ अन् बेसुमार प्राणिहत्येमुळे त्याना उपास घडू लागले. या साऱ्या कारणानी वैतागलेल्या ओंगे लोकाना गोळा करून सरकारन एका बदिस्त वसाहतीत स्थायिक केल सारा बगला पाहुण्याच्या हवाली करून घरमालकान जिन्याखालच्या खोलीत ससार थाटावा तसे हे जगलचे राजे टिचभर वसाहतीत मुक्कामाला आले.

सुदैवान इथ त्याच्यासाठी अनेक सुखसोयी पुरवल्या होत्या. प्राथमिक स्वास्थ्य केन्द्र, शाळा, हस्तकलेच शिक्षण याची व्यवस्था होती पोटापाण्याची सारी व्यवस्था मायबाप सरकारन केली होती. जरूर पडेल ती शिधासामग्री, दाराशी येऊन पोचत होती

—✱—

# अंदमानचा सोनेरी खजिना

हातात पेन घेऊन, समोरच्या कोऱ्या कागदाकडे पाहत मी किती तरी वेळ उगीचच बसून राहिले आहे आज हा अखेरचा लेख लिहिताना मन कस रिकाम-रिकाम झाल आहे-- थेंबाथेंबान गळून रित होणाऱ्या अभिषेकपात्रासारख !

अदमान-निकोबारची सफर तर कधीच सपली होती आठवणींची आनदयात्रासुद्धा आज सपणार आहे जगलातली अनोळखी पाऊलवाट माग टाकून मी घराकडच्या प्रेमळ वळणावर येऊन पोचले आहे. सपलेल्या प्रवासातले सारे मुक्काम पुन्हा एकदा मागे राहिले आहेत. पूर्वी एकदा हरवलेले सोनेरी क्षण आज पुन्हा एकदा घटिकापात्रातल्या वाळूसाखे हातून गळून गेले आहेत आता उरला आहे फक्त त्यांचा अस्पष्ट सुगंध !

समुद्रकाठी शंख-शिपले वेचावेत तसेच मी अंदमानच्या प्रवासात हे सोनेरी क्षण वेचून वेचून पदरात बांधून आणले अन् तरीही, 'अदमानहून काय काय आणलस' या रुक्ष प्रश्नावर माझ्याकडे काही उत्तर नव्हत. लेखमालेच्या निमित्तानं माझा हा अनमोल खजिना पुन्हा एकदा उघडला गेला. आता मात्र ही दौलत गोळा करून मनाच्या कप्प्यात सुरक्षित ठेवायला हवी.

मला वाटत, अदमानला 'काळ पाणी' हे नाव देऊन तिथल्या निसर्गसौंदर्यालासुद्धा आम्ही जन्मठेपेची शिक्षा फर्मावली आहे सुदर सगमरवरी राजवाडा भूतबाधेच्या खुळचट अफवेमुळे ओसाड पडावा तसच झालय हेसुद्धा !

इथल्या रस्त्यांवर अजगरांचे स्पीडब्रेकर पसरलेले असावेत किंवा इथं बादलीतल्या पाण्यात मगरी सापडत असाव्यात असा बहुसंख्य लोकांचा प्रामाणिक समज असतो, त्यामुळं चुकून कधी तिकडं जायचंच झालं तर सूटकेसमध्ये एखादं छानसं चिलखतही नेलेलं बरं, असंच त्यांना वाटत असतं

खरं म्हणजे स्वतंत्र भारताचा झेंडा सर्वांत प्रथम अदमानवर फड-कला ३० डिसेंबर १९४३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी पोर्ट ब्लेअरमध्ये स्वातंत्र्याची घोषणा केली. पण आज उण्या-पुऱ्या ४० वर्षांत आपल्याला या प्रदेशाची फारशी आठवणही राहिली नाही मला आठवतं, मी एकदा पुण्यातल्या मोठ्या पोस्टात गेले होते सहज म्हणून मी चौकशी केली—

"अदमानमधल्या पोर्ट ब्लेअरचा पिन कोड नंबर काय ?"

खिडकीच्या गजाआडून कुत्सित उत्तर आलं,

"पिनकोड फक्त आपल्या देशासाठी देतात. परदेशी गावासाठी नाही !"

अदमान-निकोबारला जाण्यासाठी पासपोर्ट लागतो असाही एक गैरसमज बऱ्याच लोकांच्या मनात असतो अदमानला जाणं अवघड नाही

कलकत्ता आणि मद्रास या दोन्ही ठिकाणाहून अंदमानसाठी जहा-जाची आणि विमानाची सोय असते जहाजाचा प्रवास तीन ते चार दिवसांचा असतो तिकिटाचा दर कमीत कमी १०० आणि जास्तीत जास्त ६०० असतो— आपल्या खिशाला कोणता वर्ग परवडेल ते ज्यानं त्यानं ठरवावं जहाजाच्या प्रवासात जेवणाचे, पाण्याचे पैसे वेगळे भरावे लागतात साधारणतः दर दहा दिवसांनी एक जहाज रवाना होतं

विमानप्रवासाला साधारणतः दोन तास लागतात. एका वेळेचं भाडं साधारण ८०० रुपये असतं आठवड्यातून दोन फ्लाइट उपलब्ध आहेत हल्ली या मार्गावर 'बोईंग–७३७ विमान उडताना दिसतात.

येणाऱ्या-जाणाऱ्या साऱ्या जहाजांसाठी रिझर्वेशन मात्र पोर्ट ब्लेअर-

मधूनच होतं ज्यांना दुसऱ्या किंवा पहिल्या वर्गाच्या केबिनमधून प्रवास करावयाचा आहे, त्यांना पोर्ट ब्लेअरच्या सेक्रेटरीएटकडे अर्ज पाठवावा लागतो

लाल फितीच्या परंपरेनुसार या साऱ्या पत्रव्यवहारात बराच कालावधी जातो त्यामुळ 'दूरदृष्टी'न योजना आखावी लागते जर उडत गेल तर हा त्रास पडत नाही इंडियन एअरलाइन्सच्या कचेरीतून चटकन व्यवस्था होते.

पोर्ट ब्लेअरमध्ये प्रवाशासाठी पंचतारांकित हॉटेलपासून टूरिस्ट होमपर्यंत सार काही उपलब्ध आहे पण बुकिंग मात्र आधी करून ठेव-लेल बर

पोर्ट ब्लेअरमधील आणि आसपासची प्रेक्षणीय स्थळ तुम्हाला दाखविण्यासाठी एखादा राजू गाईड बस घेऊन तयार असतोच रॉस, व्हायपर यासारख्या जवळच्या बेटांना भेट देण्यासाठी ट्रिप काढता येतात

अंतर्भागात दळणवळण करणाऱ्या जहाजावरून दक्षिणेकडे हट बे, कारनिकोबारपर्यंत, तर उत्तरेकडे मायाबंदर, दिगलीपूरपर्यंत ३-४ दिव-साचा प्रवास करून येण सहज जमण्यासारख असत मात्र निघण्यासाठी पोर्ट ब्लेअरच्या सचिवालयातून प्रवासी परवाना काढायला विसरायच नाही मोठी सुट्टी असेल तर दक्षिणेकडच्या ग्रेट निकोबारपर्यंत जायला काय हरकत आहे ? वाटेत कार निकोबार, कचाल, नानकौरी या बंदराची भेट घेता येते शिवाय ग्रेट निकोबारचा पिग्मॅलियन पॉईंटसुद्धा पाहता येतो— मात्र त्यासाठी 'यान्त्रिक वाल्याकडे आधीच वशिला लावून ठेवायला हवा

अंदमान-निकोबारच वर्णन वाचल्यावर किती तरी वाचकांनी प्रत्यक्ष भेटीची इच्छा प्रदर्शित केली होती म्हणून ही सारी माहिती सांगितली पण एवढ वाचून जर कुणी सामान बांधण्याच्या विचारात असेल तर मला एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते ज्या लोकांची 'मनोरंजन' या शब्दाची व्याख्या, चित्रपट-डिस्को अन् कॉकटेल या त्रिकोणावर आधारित असते, त्या लोकांनी या वाटेन जाऊ नये अजून

तरी इथल्या कॉकटेल पार्टी फौजी छावणीत बंदिस्त असतात डिस्को डान्स हा प्रकार फक्त मिथुन चक्रवर्तीनंच करायचा असतो असा बहुसंख्य लोकांचा समज आहे आणि चित्रपट ?

इथला फिल्म ऑपरेटर इब्राहीम म्हणजे अदमान-निकोबार बेटा-वरची सर्वांत लोकप्रिय असामी लहान-मोठ्या साऱ्या बेटावर म्हाताऱ्या-कोताऱ्यापासून पोरा-टोरापर्यंत सारे नेहमी याची वाट पाहत असतात—अशोकवनातल्या सीतेनं रामाची अंगठी घेऊन येणाऱ्या हनुमंताची वाट पाहावी तेवढ्याच आतुरतेनं ।

त्याचं काय आहे की, इथं पोर्ट ब्लेअर आणि कार निकोबार सोडलं तर इतर कुठंच सिनेमाची थिएटर्स नाहीत त्यामुळे हा ऑपरेटर १६ मिलिमीटर चित्रपटाच्या रिळाचे डबे आणि प्रोजेक्टर खांद्यावर टाकून या बेटावरून त्या बेटावर हिंडत असतो

हा हनुमंत या वेळी रामाची कोणती अंगठी आणतो याची सारेच उत्सुकतेनं वाट पाहत असतात हा ज्या बेटावर पोचेल तिथं पोरांना गृहपाठ माफ असतो कारण त्या वेळी पोरांना गृहपाठ लिहायला अन् मास्तरांना तो तपासायला वेळच नसतो

कोरा कागज ', ' गोलमाल ' ' बरसात या चित्रपटाच्या त्यानं आणलेल्या फिल्म कॅम्पबेल बेच्या मैदानावर बसून पाहताना मला पुण्या-मुंबईच्या गणेशोत्सवाची आठवण झाली

सतरंजीखालून टोचणाऱ्या खड्याकडे दुर्लक्ष करत, उघड्या आकाशाखाली बसून, मध्येच दहा वेळा तुटणारी ती फिल्म पाहण्यात-सुद्धा केवढा आनंद असतो नाही ?

अदमान निकोबार हा प्रदेश विषुववृत्तीय हवामानाचा त्यामुळे इथं वर्षातून ६-७ महिने पाऊस पडत असतो नोव्हेंबर ते जानेवारी हा इथला सर्वांत जास्त मौसम फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरू होतो मार्च महिन्यात समुद्र किनाऱ्यावर दिवसभर शूटिंग करताना वाटायचं की, संध्याकाळपर्यंत बहुधा आपलंच ' तंदूरी चिकन ' झालेलं असणार

चिकन म्हटल्यावर काही प्रवाशांच्या तोंडाला पाणी सुटणारच, तेव्हा आता त्यावर थोडंसं बोलू या

अदमानच्या अतर्भागात, छोट्या छोट्या बेटावर रहायच म्हटल तर 'मेनू कार्ड' मुळीच मागायच नाही पण या उलट पोर्ट ब्लेअरमध्ये उतरणाऱ्या प्रवाशासाठी मात्र मच्छी करीपासून मसाला डोसापर्यंत सार उपलब्ध असत त्यामुळ उगाच चकल्या-शकरपाळ्याच ओझ बरोबर नेण्याची जरूर नाही.

अन् खर म्हणजे नव्या प्रदेशात गेल्यावर नितळ्या दृश्याप्रमाणे खाद्याचाही आस्वाद मनमोकळेपणान घ्यायला हवा, नाही का ? काश्मीरच्या शिकाऱ्यात बसल की, कबाबच खायला हवेत, तिथ बटाटे पोह्याचा आग्रह कशाला धरायचा ? आळूची भाजी अन् काद्याच पिठल असल्या 'होम मेड' गोष्टीतच मन गुतून राहणार असेल तर अदमान-लाच काय पण औंधलासुद्धा जाऊ नये– सरळ घरीच बसाव !

मला माहीत आहे, आता तुम्ही म्हणणार, "छट् ! एवढ्या कटकटी असतील तर कशाला जायच ? आहे काय तिथ एवढ ?"

कधी तरी शाळेत चित्रकलेच्या मास्तरांकडून शिकलेल असत, आभाळाचा रग निळा, रान कस हिरवगार, समुद्र निळसर, क्षितिजाचा रग धूसर जाभळा अन् असच खूप काहीतरी ! पण वर्षानुवर्षं आपण भोवती पाहत असतो ते धुरकटलेल आभाळ, राखाडी समुद्र, वठलेली उजाड रान अन् विटक क्षितिज.

अदमानला जायच कधी काळी कानी पडलेल्या या रगीबेरगी विशेषणाची जादू डोळ्यानी पाहण्यासाठी वाहनाच्या वाढत्या कोलाह-लान अन् निरर्थक घोषणाच्या गोंगाटान बधिर झालेल्या कानांवर निखळ शाततेच मलम लावण्यासाठी घड्याळाच्या काट्याबरोबर शर्य-तीत धावता धावता बधिर झालेल्या सवेदनावर नव्या उमेदीची फुकर घालण्यासाठी बोनस आणि प्रमोशन्सच्या सकुचित स्वप्नात कोंडलेल्या कल्पनाशक्तीला नव्या प्रेरणेच जीवदान देण्यासाठी

अन् हे सार आत्ताच शक्य आहे आजपासून १५–२० वर्षांनतर कदाचित हेही एक मृगजळच ठरेल– आजच्या गोव्यासारख !

अदमान निकोबारच चित्र बदलत आहे. गावाच रूप पालटल आहे नव्या सुधारणाची पावल वाजत आहेत.

कुठं कुठं एकटीच उभी असणारी धुराडी हळूहळू धूर ओकायला लागली आहेत. आता त्यांची प्रजा वाढायला लागेल. मग औद्योगिक प्रगतीची धुरकट पताका साऱ्या आकाशभर फडफडू लागेल. विजेचे खांब आणि तारा यांचे अक्षांश-रेखांश इथल्या अनिर्बंध निसर्गावर उभ्या-आडव्या रेघोट्या मारून ठेवतील. भडक जाहिरातींचे बटबटीत फलक कावळ्याच्या छत्र्यासारखे उदंड माजतील. कर्कश कोलाहलाच्या मंत्र-पठणानं या यंत्रयज्ञाची नांदी होईल आणि अखेर इथल्या निर्मळ निसर्गाची अन् निष्पाप मनांची आहुती या यज्ञात पडेल.

मग अदमानला जायची काही जरूरच राहणार नाही !

पण आज मात्र मनू आणि कामायनी यांची प्रणयकथा चित्रित करायची असेल तर त्याचं शूटिंग करायला मी अदमानलाच जाईन !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
(स्थळ प्रत)

REFBK-0025096